## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी तसेच न्यूज चॅनलकरिता प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



दैनिक

# जनता आवाज



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

तिष उत्तमराव खर्डे पा. 552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥

जुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334



अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक २१४ | रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


# कर्जाचे पुनर्गठन नको, कर्जमुक्ती हवी

## उद्धव ठाकरेंचा राज्य सरकारवर हल्लाबोल

## छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेनेचा हंबरडा मोर्चा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर : पुरामुळे शेतकऱ्यांकडे गुरांना खावू घालायला कडबा उरला नाही. मग शेतकऱ्यांनी माती खायची काय? सरकारने कर्जाचे पुनर्गठन करण्याचा निर्णय घेतला आहे. पण आम्हाला कर्जाचे पुनर्गठन नको आहे. आजचे मरण उद्या नको. आम्हाला संपूर्ण कर्जमाफी हवी आहे. मी मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून दाखवले होते. आम्ही फक्त शेतकऱ्यांचे अंगठे घेऊन त्यांच्या खात्यांते पैसे दिले होते. तेव्हा मुख्यमंत्री डोळ्याला भात लावून बसले होते, असा हल्लाबोल माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर चढविला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने काल छत्रपती संभाजीनगरात हंबरडा मोर्चा काढला. स्वतः पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. यावेळी ते बोलत होते.**



मोर्चाद्वारे त्यांनी अतिवृष्टीमुळे गलितगात्र झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्यासह त्यांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याची मागणी केली. यासाठी संभाजीनगरसह आसपासच्या अनेक जिल्ह्यांतील शेतकरी व ठाकरे गटाचे कार्यकर्ते संभाजीनगरात एकवटले होते. ठाकरे गटाने हा मोर्चा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काढला. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी या मोर्चाद्वारे आपल्या पक्षाला मराठवाड्याच्या राजधानीत पुन्हा एकदा गतवैभव मिळवून देण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, विरोधी पक्षनेता नेमण्यासाठी नियम कायदे लागत असतील तर उपमुख्यमंत्री कसा नेमला जातो? संविधानात उपमुख्यमंत्रीपदाचा कोणताही उल्लेख नाही. त्यानंतरही येथे दोन-दोन उपमुख्यमंत्री नेमण्यात आलेत. त्यामुळे तुम्ही आम्हाला विरोधी पक्षनेतेपद देत नसाल, तर या अवैध उपमुख्यमंत्र्यांचाही दर्जा काढून घ्या. हे दोन्ही उपमुख्यमंत्री साधे मंत्री म्हणून फिरले पाहिजे. त्यांना उपमुख्यमंत्र्यांची मस्ती करता येणार नाही. आम्ही त्यांना उपमुख्यमंत्री मानत नाही हे मी जाहीर करतो. आमचे उपमुख्यमंत्री कुणीही असू शकत नाहीत.

तुमच्याकडे एवढे पाशवी बहुमत आहे. केंद्राच्या सरकारचा वरदहस्त तुमच्यावर आहे. तरीही तुम्ही विरोधी पक्षनेत्यांना घाबरता? विरोधी पक्षांना घाबरता? जोपर्यंत सर्वसामान्य जनता आमच्या पाठिशी आहे, तोपर्यंत आम्हाला अशा कोणत्याही पदाची गरज नाही. आम्ही जसे बसायचे तसे तुमच्या बोकांडी बसतच आहोत. पण विरोधी पक्षनेत्याला काही विशिष्ट पान ४

### ठाकरेंनी मोर्चापूर्वी आरसा पाहावा : मुख्यमंत्री

उद्धव ठाकरे यांनी एकदा स्वतःला आरशात बघितले, तर ते अशा प्रकारचे मोर्चे काढणार नाहीत. मी यापूर्वीही सांगितले की, ठाकरेंनी त्यांच्या सरकारच्या काळात २० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करण्याची घोषणा केली. पण त्यांनी फुटकी कवडी शेतकऱ्यांना दिली नाही. आम्ही सत्तेत होतो. तेव्हाही आम्ही शेतकऱ्यांना २० हजार कोटींची कर्जमाफी केली होती. त्यामुळे त्यांनी काही फार मोठे काम केले असे नाही. उलट त्यांनी घोषणा केली होती, चालू खात्यावर आम्ही ५० हजार रुपये देऊ. पण प्रत्यक्षात त्यांनी काहीही दिले नाही. उलट १६ लाख शेतकऱ्यांना महायुतीचे सरकार आल्यावर अनुदान देण्यात आले, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची खुर्ची गेली तेव्हा हंबरडा फोडला. खासदार पडले तेव्हा हंबरडा फोडला. विधानसभा निवडणुकीत आमदार पडले तेव्हा हंबरडा फोडला. ते आणखी कितीवेळा हंबरडा फोडणार आहेत? आमच्या पॅकेजवर टीका करणारे उद्धव ठाकरे हे पैठण येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला भेटायला गेले होते. तेव्हा ते १ लाख रुपयांचा धनादेश देणार असे शेतकऱ्यांना सांगण्यात आले होते. पण त्या शेतकऱ्याला एक फुटकी कवडीही त्यांनी दिली नाही. तुम्ही मुख्यमंत्री होता, तेव्हाही तुम्ही शेतकऱ्यांना मदत केली नाही. म्हणूनच शेतकऱ्यांनी तुम्हाला घरी बसवले आहे.

**– एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री**

## संमिश्र

### ओमराजे निंबाळकर यांची सरकारवर टीका

**जनता आवाज वृत्तसेवा**

**धाराशिव** : राज्यातील अतिवृष्टी आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे आर्थिक पॅकेज जाहीर केले आहे. या पॅकेजअंतर्गत मदतीची मर्यादा दोन हेक्टरवरून तीन हेक्टरपर्यंत वाढवण्यात आली असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, या पॅकेजबाबत शेतकऱ्यांमध्ये आणि विरोधी पक्षांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. मदतीचे निकष अव्यवहार्य असून, दिलेली मदत तुटपुंजी असल्याचा आरोप शेतकरी आणि विरोधी नेते करत आहेत.

### आनंदाचा शिधा योजनेवर प्रश्नचिन्ह

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : यंदा दिवाळीत आनंदाचा शिधा मिळणार नसल्याची घोषणा अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केल्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वक्तव्याने या योजनेच्या भवितव्याबद्दल मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्या योजना चालू असतात, त्या सगळ्याच कायम चालतात असे नाही. त्या त्या वेळेसची परिस्थिती लक्षात घेऊन बदल केले जातात, असे स्पष्ट विधान अजित पवार यांनी केले आहे.




# कबूतर, गाय राष्ट्रीय प्राणी घोषित करा

## सुरेश महाराज; कबूतरखान्यावरून मुंबईत जैन धर्मियांचा आक्रोश

**जनता आवाज वृत्तसेवा**



**मुंबई** : कबूतर हा साधा पक्षी नाही. त्याची हत्या म्हणजे भगवान शंकराची हत्या करण्यासारखे आहे. आज कबूतरांवर अत्याचार होत आहेत, त्यामागे राजकीय स्वार्थ आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती करतो की कबूतर आणि गाय या दोन्ही प्राण्यांना राष्ट्रीय प्राणी घोषित करावे, अशी मागणी जैन संत सुरेश महाराज यांनी केली असून सरकारवर निशाणा साधला आहे.

मुंबईत जैन धर्मियांकडून कबूतरांच्या आत्मशांतीसाठी धर्मसभा आयोजित करण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

मुंबईतील दादर कबूतरखाना या मुद्द्यावरून गेल्या काही दिवसांपासून वादंग सुरू आहे. महानगरपालिकेकडून कबूतरखान्याबाबत कारवाईची तयारी सुरू असतानाच, जैन समाजाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर या सभेत जैनमूनी कैवल्य रत्न महाराज, सुरेशजी महाराज, स्वरूपानंदजी महाराज यांच्यासह अनेक साधुसंत उपस्थित होते.

धर्मसभेत बोलताना जैनमूनी कैवल्य रत्न महाराज यांनी सरकारवर आणि डॉक्टरांवरही संताप व्यक्त केला. कबूतर शांतताप्रिय प्राणी आहे. आमचा धर्म सांगतो की दुसऱ्यासाठी मरणे हेही पुण्य आहे. रावणासमोर जटायू पक्षी लढला पान ४

### जैन धर्मियांचा सरकारला इशारा

कबूतरांमुळे आजार होतो असा कोणताही वैज्ञानिक पुरावा आजपर्यंत मिळालेला नाही. मग अचानक आता हा प्रश्न का उपस्थित केला जातोय? इतकी वर्षं दादर कबूतरखाना अस्तित्वात आहे, कधीच कोणते आरोग्य संकट निर्माण झाले नाही. मग आजच का? यामागे कुणाचातरी विकास प्रकल्प दडलेला आहे का? जर कबूतरखाना हलवायचा असेल, तर सरकारने जैन समाजाशी चर्चा करावी. अन्यथा आगामी निवडणुकांमध्ये याची किंमत सत्ताधाऱ्यांना मोजावी लागेल, असा इशारा समाजाने दिला.

# विकास कागदावर नव्हे, जमिनीवर दिसायला हवा

## अजित पवारांचा अधिकाऱ्यांना संदेश; भल्या पहाटे खडकवासला दौरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : शहरातील रस्ते, पूल, आणि वाहतूक सुधारणा प्रकल्पांसंदर्भात अधिकाऱ्यांना सविस्तर अहवाल सादर करा. विकास हा फक्त कागदावर नाही, तो प्रत्यक्ष जमिनीवर दिसला पाहिजे, असा संदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना दिला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खडकवासला



विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामांचा आढावा घेतला. पहाटेपासून सुरू झालेल्या या दौऱ्यात त्यांनी वारजे, आहिरेगाव, धायरी आणि नांदेड सिटी परिसरातील पान ४

### शिवणे पूल उंच करण्याचे आदेश

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्यास शिवणे पूल पाण्याखाली जातो. त्यामुळे पूल उंच करण्याचे आदेश उपमुख्यमंत्र्यांनी दिले. वारजे-शिवणे पुलाची तसेच धायरी परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या धायरी डीपी रोड आणि कात्रज चौकातील उड्डाणपूल कामांची त्यांनी सविस्तर पाहणी केली.

# कोपरगाव मतदार संघात ग्रामपंचायतींच्या इमारती होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदारसंघातील अनेक ग्राम पंचायतीच्या मागणीनुसार ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीसाठी निधी मिळावा, यासाठी केलेल्या पाठपुराव्याची महायुती शासनाने दखल घेवून मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजने अंतर्गत कोपरगाव मतदारसंघातील पाच ग्रामपंचायत



कार्यालयाच्या नूतन इमारतीसाठी १ कोटी १५ लाख निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली आहे.

यामध्ये कोपरगाव मतदार

## आ. आशुतोष काळे यांची माहिती; नूतन इमारतीसाठी १ कोटी १५ लाख निधी मंजूर

संघातील कोळपेवाडी, सुरेगाव, घारी, घोयेगाव व पढेगाव या ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीचा समावेश असून कोळपेवाडी, सुरेगाव, पढेगाव या ग्रामपंचायत कार्यालयाच्या नूतन इमारतीसाठी प्रत्येकी २५ लाख तर घारी, घोयेगाव या ग्राम पंचायत कार्यालयासाठी पान ४

### आ. काळेंसह ग्रामस्थांनी मानले आभार

ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीसाठी १ कोटी १५ लाख निधी दिल्याबद्दल आ. आशुतोष काळे यांच्यासह कोळपेवाडी, सुरेगाव, घारी, घोयेगाव व पढेगाव ह्या पाच गावातील ग्रामस्थांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार मानले आहे.

# ३० दिवसांत होणार जमिनींची मोजणी

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची घोषणा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : राज्यातील नागरिकांना जमिनीच्या मोजणीसाठी महिनोमहिने सरकारी कार्यालयांचे उंबरे झिजवावे लागायचे. मात्र, आता ही प्रतीक्षा इतिहासजमा होणार आहे. आता मोजणीच्या कामासाठी खासगी परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे मोजणीचा अर्ज दाखल केल्यानंतर केवळ ३० दिवसांत प्रमाणपत्र मिळणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. पान ४

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार या संदर्भात कायद्यात दुरुस्ती आणि नवीन नियमावली तयार केली जाईल. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशप्रमाणे महाराष्ट्रातही जिल्हानिहाय परवानाधारक खासगी भूमापकांची इम्पॅनलमेंट केली जाईल. या भूमापकांसाठी तांत्रिक पात्रता आणि पात्रतेची निकष ठरवली जातील. अर्ज मिळाल्यानंतर ३० दिवसांच्या आत मोजणी पूर्ण करून, नंतरच खरेदीखत आणि फेरफार प्रक्रिया करायची.

**– चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री**

# कोपरगावात तीन दुकानांचा कोळसा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोपरगाव:** शहरातील टिळक नगर भागातील तीन दुकानांना मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात कारणाने आग लागली असून यात तीन दुकाने जळून खाक झाली. ही घटना मध्यरात्री तीन वाजेच्या दरम्यान घडली.

आगीची माहिती मिळताच कोपरगाव नगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे फायरमन प्रमोद सिनगर, विशाल कासार, संजय विधाते, प्रशांत शिंदे यांच्यासह सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना अग्निशमन दल यांनी घटनास्थळी दाखल होत स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग मोठ्या प्रयत्नांनी आटोक्यात आणली. या आगीत मोबाईल दुकान, स्वस्त धान्य दुकान जळून खाक झाले असून त्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

# शिवशक्ती-भीमशक्तीचा आज मोर्चा

## आ. संग्राम जगताप, सागर बेग, ॲड. निकाळजे यांची उपस्थिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : संपूर्ण हिंदू समाजाच्या वतीने आज, दि.१२ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर शहरात शिवशक्ती-भीमशक्ती एकतेचे प्रतीक ठरणारा भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.

या मोर्चास नगर शहराचे आ. संग्राम जगताप, हिंदुत्ववादी नेते सागर बेग आणि ॲड. वाल्मिक निकाळजे यांची प्रमुख



उपस्थिती राहणार असून, शहरात या मोर्चाबाबत मोठा उत्साह आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. हा मोर्चा हिंदू एकतेचे व राष्ट्रनिष्ठेचे प्रदर्शन ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या मोर्चाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून होणार पान ४

# सरकार शेतकऱ्यांच्या जखमेवर चोळतेय मीठ : नाना पटोले

**जनता आवाज वृत्तसेवा**



**मुंबई** : महायुतीचे सरकार हे जनतेच्या मताने नव्हे, तर बेईमानीने निवडून आलेले सरकार आहे. निवडणुकीदरम्यान जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते, पण सत्तेत आल्यानंतर हेच सरकार शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत असल्याची टीका काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

भाजप हा पूर्णपणे जातीवादी आणि विभाजनवादी पक्ष भाजपचे उद्दिष्ट देशातील समाजात फूट पाडून, धर्म आणि जात याच्या आधारावर राजकारण करणे हेच असल्याचा आरोप त्यांनी केला. या लोकांनी धर्माचे विष इतके मोठे पेरले आहे की, आज सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांवर जोडा फेकून मारण्याचे कृत्य होत आहे. यापेक्षा देशाचे अजून कोणते दुर्भाग्य असू शकते? असा तीव्र सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केला. त्यांनी केंद्र सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक मोहन भागवत यांच्यावर थेट निशाणा साधत म्हटले की, या प्रकारामागे यांच्याच संस्कारांचा आणि विचारसरणीचा परिणाम आहे.

पटोले म्हणाले की, देशाचे सरन्यायाधीशांवर ज्या पान ४

# शिवपुराण कथा ऐतिहासिक अध्यात्मिक सोहळा ठरणार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील; पंडीत प्रदीप मिश्रा यांच्या शिवपुराण कथेचा आजपासून प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : पंडीत प्रदीप मिश्रा यांच्या शिवपुराण कथेचा कार्यक्रम जिल्ह्याच्या परंपरेला साजेसा ऐतिहासिक अध्यात्मिक सोहळा ठरणार असून भाविकांच्या गर्दीचा उच्चांक मोडणारा ठरेल, असा विश्वास जलसंपदा तथा पालक मंत्री ना





राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

अस्तगाव येथे ७५ एकराच्या भव्य मैदानावर रविवार पासून पंडीत प्रदीप मिश्रा यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. मंत्री विखे पाटील यांनी संपूर्ण कार्यक्रम स्थळाची पाहणी करून तयारीचा आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, विनायकराव देशमुख, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक सोमनाथ वाकचौरे, तहसिलदार अमोल मोरे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

माध्यमांशी बोलतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की, पंडीत प्रदीप मिश्रा यांची अध्यात्मिक क्षेत्रात मोठा नावलौकीक आहे. त्यांच्या सुश्राव्य वाणीतून शिवपुराण ऐकण्याची संधी जिल्ह्यातील भाविकांना प्रथमच मिळत आहे. आजपर्यत ज्या ठिकाणी त्यांच्या कथेचे आयोजन झाले त्यापेक्षाही मोठा उच्चांक ठरेल असे नियोजन जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आले आहे. जिल्ह्यासह राज्यातून येणाऱ्या भाविकांची संख्या विचारात घेता दोन स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आल्या असून सुरक्षा वैद्यकीय मदत पान ४

कार्यक्रम स्थळावर तीन भव्य मंडप उभारण्यात आले असून, मुख्य मंडपात एक लाखाहून अधिक भाविक बसू शकतील तसेच अन्य दोन मंडपातही त्याच पध्दतीचे नियोजन करण्यात आले आहे. शंभर बचत गटांना त्यांच्या उत्पादनाची विक्री करण्यासाठी स्टॉल देण्यात आले असून स्वयंसेवक म्हणून नोंदणी केलेल्या भाविकांच्या निवासाची तसेच भोजनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

**– राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री**

# लक्ष्मण हाकेंच्या वाहनावर हल्ला करणाऱ्या तिघांना जामीन मंजूर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या वाहनावर हल्ला केल्याप्रकरणी मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक गोरख दळवी यांच्यासह तिघांना शुक्रवारी जामीन मंजूर करण्यात आला. त्यांनी हाके यांच्या वाहनावर हल्ला केला होता. याप्रकरणी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल होऊन अटक करण्यात आली होती.



ओबीसी नेते लक्ष्मण हाके अहिल्यानगरमधून सभेला जात असताना त्यांच्या वाहनावर मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक गोरख दळवी यांच्यासह संभाजी सप्रे आणि गणेश होळकर या तिघांनी हल्ला केला होता. हे प्रकरण राज्यभर गाजले होते.

नगर तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत हल्लेखोरांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली होती. त्यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला. त्यांच्या वतीने ॲड. महेश तवले, योगेश नेमाणे यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. संजय वाल्हेकर, एडवोकेट महेश शेडाळे आणि ॲड. अनुराधा येवले यांनी सहाय्य केले.

# नगर शहरातील सिग्नल तात्काळ सुरू करा

## राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांची आयुक्तांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरांमध्ये विविध चौकात बसविण्यात आलेले सिग्नल बंद असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने शहरातील सर्वच चौकातील सिग्नल तात्काळ सुरू करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी महापालिका आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.



निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरांमध्ये विविध चौकात सिग्नल बसविण्यात आले आहेत. मात्र, महापालिकेच्या उदासीन कारभारामुळे एक दोन चौक वगळता सर्व सिग्नल बंद आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शहरात चौकाचौकात होणाऱ्या अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

गणेश उत्सव, नवरात्र उत्सवामध्ये सिग्नल बंद असल्यामुळे अनेक ठिकाणी अपघात झाले. गेल्या काही दिवसांपूर्वी दोन ते तीन लोकांना जीव गमवावा लागला. पत्रकार चौक, प्रेमदान चौक, भिस्तबाग चौक, चांदणी चौक, यश पॅलेस चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्टेट बँक चौक तसेच उपनगरातही अनेक ठिकाणी सिग्नल बसविण्यात आले आहेत. मात्र, तांत्रिक कारणाअभावी जवळपास सर्वच सिग्नल बंद आहेत. त्यामुळे प्रेमदान चौक, एसबीआय चौक, चांदणी चौक अशा महत्त्वाच्या चौकांमध्ये वारंवार किरकोळ अपघात घडत आहेत.

> पत्रकार चौक ते डीएसपी चौक दरम्यान रस्त्याचे काम सुरु असल्याने वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. सिग्नल सुरु नसल्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होते आणि त्यात अपघातातही होतात. त्यामुळे महापालिका प्रशासनाने तात्काळ शहरातील बंद असलेले सिग्नल सुरु करावेत. जेणेकरून वाहतूक व्यवस्था सुरळीत होईल आणि सामान्य नागरिकांचा त्रास कमी होईल. दिवाळीपूर्वी शहरातील सर्व सिग्नल सुरु करावेत अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाला दिला आहे.
>
> **– संपत बारस्कर**

# मुलींनो, मार्शल आर्टमधून स्वत:ला सक्षम करा

## सुवर्णा जगताप; 'अरुणोदय'च्या एकदिवसीय शिबिरात विजेत्यांचा गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आजची मुलगी डोक्यावर पदर घेणारीच नव्हे, तर गरज पडल्यास फेटा बांधणारीही झाली पाहिजे. समाजात घडणाऱ्या विविध घटनांच्या पार्श्वभूमीवर मुलींनी शारीरिकदृष्ट्या सक्षम असणे अत्यावश्यक आहे. केवळ शिक्षणच नव्हे, तर आत्मसंरक्षणाचे कौशल्य ही काळाची गरज आहे. मार्शल आर्टच्या माध्यमातून आत्मविश्वास वाढतो, धैर्य निर्माण होते आणि संकटांना सामोरे जाण्याची ताकद मिळते, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य सुवर्णा जगताप यांनी केले.



> आपल्या घरातील, गावातील मुलींनी कधीही कोणत्याही प्रसंगी भीती न बाळगता सामोरं जायला शिकावं. मुलींनी स्वतःमध्ये असलेली ताकद ओळखून स्वतःचं संरक्षण करणं ही आपली जबाबदारी आहे. समाजात स्त्रीला केवळ अबला न समजता, सबला म्हणून स्वीकारलं जावं, यासाठी अशा प्रशिक्षण शिबिरांची गरज आहे. अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठानचं हे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे.
>
> **– सुवर्णा जगताप**

अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठानच्यावतीने नुकतेच अहिल्यानगर येथे एक दिवसीय मार्शल आर्ट प्रशिक्षण शिबिर अत्यंत यशस्वी व उत्साही वातावरणात पार पडले. यावेळी त्या बोलत होत्या.

या शिबिरात ब्लॅक बेल्ट मिळविणाऱ्या खेळाडूंना प्रमाणपत्रांचे वितरण माजी जिल्हा परिषद सदस्य सुवर्णाताई सचिन जगताप यांच्या हस्ते भूमी धामणे, तनिशा धनाड, शनाया घुले, रिद्धी बडगुजर, आदित्य भंडारी, श्रीराज सुपेकर, पलक आनंदकर, कार्तिक पठारे, संविध गांधी, साई कुर्हे, विवेक दिसले, आदित्य सानप, कार्तिक ढोरे, आरव टेमकर, समर्थ राऊत, शौर्य कुंभार, वैष्णवी सानप, अदिती दिसले, श्रेया फाटे यांना देण्यात आले.

अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठाच्या सर्व खेळाडूचे आमदार संग्राम जगताप, उपमहापौर गणश भोसले, जिल्हा लेबर फेडरेशनचे अध्यक्ष विकी जगताप यांनी अभिनंदन केले.

# साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कवी-लेखक इंद्रजीत भालेराव

## ८-९ नोव्हेंबरला नगरमध्ये रंगणार सेनापती बापट साहित्य संमेलन; आत्मनिर्धार फाउंडेशनतर्फे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या अंतर्गत साहित्य आणि संस्कृती मंडळांच्या समन्वयाने अहिल्यानगर शहरात दिनांक ८-९ नोव्हेंबर २०२५ रोजी सुखकर्ता लॉन व मंगल कार्यालय (नेप्ती बायपास चौकाजवळ, कल्याण रोड, अहिल्यानगर) येथे दोन दिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध कवी-लेखक इंद्रजीत भालेराव यांची निवड करण्यात आल्याची माहिती संयोजक सचिन मोहन चोभे यांनी दिली.

याबद्दल अधिक माहिती देताना चोभे यांनी सांगितले की, स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट यांच्या विचारांना उजाळा देण्याच्या उद्देशाने यंदाच्या साहित्य संमेलनास त्यांचे नाव दिलेले आहे. चालू वर्षी अवघ्या महाराष्ट्रात ओला दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी-कष्टकरी यांच्यावर संकट ओढवले आहे. अशावेळी साहित्याच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी व वंचित घटकांच्या परिस्थितीवर चर्चा होण्याच्या उद्देशाने सुप्रसिद्ध कवी-लेखक इंद्रजीत भालेराव यांची निवड करण्यात आली आहे. आत्मनिर्धार फाउंडेशन (निंबळक, ता. नगर) यांना यंदाच्या जिल्हा साहित्य संमेलनाचे नियोजन करण्याचा मान मिळाला आहे. जिल्ह्यासह



शेजारील पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड, सोलापूर आदि जिल्ह्यातील साहित्यिक, कवी आणि साहित्यरसिक या संमेलनात सहभागी होत आहेत.

### विविधांगी कार्यक्रमांची असणार रेलचेल

दोन दिवसीय साहित्य संमेलनात व्याख्यान, लोककलांचे सादरीकरण, परिसंवाद, काव्य संमेलन असे भरगच्च कार्यक्रम आयोजित केले जाणार आहे. त्यासाठीची तयारी अंतिम टप्प्यात आहे. साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य तथा निरीक्षक बी. जी. शेखर व डॉ. राजेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सत्राचे नियोजन केले जात आहे. नामांकित आणि नव साहित्यिकांचा मेळ बसवून सत्र ठरवले जात आहेत. संमेलनाच्या अध्यक्षपदावर अनेक नावांची चर्चा झाली. मात्र, एकूण ग्रामीण भागातील महत्वाचे संमेलन लक्षात घेऊन यंदा शेती-मातीची भाषा बोलणारे लेखक-कवी म्हणून सुप्रसिद्ध कवी-लेखक इंद्रजीत भालेराव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संयोजन समितीचे कार्याध्यक्ष ह. भ. प. सिद्धीनाथ मेटे महाराज यांनी दिली.

# चर्मकार महासंघाकडून गवईंवरील हल्ल्याचा निषेध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांच्यावर न्यायालयीन सुनावणीदरम्यान बूट फेकून हल्ला करण्याच्या घटनेचा तीव्र निषेध राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने करण्यात आला आहे. या घटनेत सहभागी असलेल्या वकिलावर तत्काळ व कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महासंघाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात भेट देऊन ही मागणी केली.



> न्यायाधीशांवर बूट फिरकावणे ही घटना केवळ एका व्यक्तीवरचा हल्ला नाही, तर भारताच्या न्यायव्यवस्थेवर आणि संविधानावर थेट आघात आहे. सरन्यायाधीश भूषण गवई हे त्यांच्या कार्यकुशलतेने आणि प्रामाणिकपणाने सर्वोच्च न्यायालयात मानाचे स्थान प्राप्त केलेले न्यायाधीश आहेत. त्यांच्यावर असा अपमानजनक प्रकार घडणे म्हणजे संपूर्ण मागासवर्गीय समाजाचा अपमान आहे.
>
> **– शिवाजीराव साळवे**

यावेळी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, राज्य उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले, दिपक पाचारणे, मानिक नवसुपे, ज्ञानेश्वर म्हेसमाळे, अतुल देव्हारे, आप्पासाहेब केदारे, संतोष उदमले आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सर्वोच्च न्यायालय हे देशातील न्याय, समता आणि संविधानाचे सर्वोच्च मंदिर आहे. अशा ठिकाणी देशाचे सरन्यायाधीश, जे स्वतः अनुसूचित जातीतील आहेत, त्यांच्यावर अशा प्रकारे हल्ला होणे अत्यंत लज्जास्पद आणि गंभीर बाब असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे

# केडगावमध्ये चार ते सहा दिवसांनी पाणीपुरवठा

## महापालिका प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात नागरिकांची नाराजी



> ### पाणी नाही, तर पाणीपट्टी नाही
>
> नागरिकांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, जर पुढील काही दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही, तर ते पाणीपट्टी भरण्यास नकार देतील. जेव्हा पाणी मिळत नाही, तेव्हा कर का भरायचा? हा आमच्यावरचा अन्याय आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.
>
> ### आंदोलनाच्या पवित्र्यात नागरिक
>
> स्थानिक रहिवासी संघटना, महिला मंडळे आणि युवक संघटनांनी एकत्र येऊन या विषयावर आंदोलनाची तयारी सुरू केली आहे. लवकरच आयुक्त कार्यालयासमोर निदर्शन करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महापालिका हद्दीतील केडगाव उपनगरात गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठ्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. चार ते सहा दिवसांनी एकदाच पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे जगणे अक्षरशः विस्कळीत झाले आहे. घरगुती कामांसाठी, पिण्यासाठी आणि स्वच्छतेसाठी पुरेसे पाणी न मिळाल्याने महिलांना व ज्येष्ठांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या सर्व अडचणी असूनही महापालिका प्रशासनाकडून दरमहा पाणीपट्टी नियमित आकारली जात आहे. महापालिका आमच्याकडून बारामाही पाणीपट्टी घेत आहे, पण पाणी आठवड्यातून एकदाच येते. आम्ही पाणी समस्येचा सामना करावा लागतो. अनेकदा विकत पाणी आणतो, मग ही पाणीपट्टी का भरायची? असा संतप्त प्रश्न स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे.

केडगावमधील अनेक विभागांमध्ये पाणीटंचाई तीव्र असून, काही ठिकाणी नागरिकांना रात्री उशिरा पाणी मिळते. अनेकांना झोप मोडून पाणी साठवावे लागते. महापालिकेने जलवाहिन्या दुरुस्त केल्या नाहीत, मोटर वेळेवर सुरू केल्या जात नाहीत, आणि पुरेशा दाबाने पाणी मिळत नाही. हे सगळं दुर्लक्षच आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

नागरिकांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्यावर टीका करत म्हटले आहे की, आयुक्त विविध योजनांची प्रसारमाध्यमांतून जाहिरात करून स्वतःची प्रसिद्धी करत आहेत, मात्र जनतेच्या मुलभूत गरजांकडे ते दुर्लक्ष करीत आहेत. पाण्यासारख्या मूलभूत सुविधेकडे दुर्लक्ष करणे म्हणजे प्रशासनाने नागरिकांशी केलेला विश्वासघात आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनीही या विषयात तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे. काही नागरिकांनी सामाजिक माध्यमांवरून प्रशासनाविरोधात संताप व्यक्त करत, पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# मानसिक रुग्णांची अनास्था चिंताजनक : डॉ. वटवानी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारताच्या सर्वांगीण सामर्थ्याचा कर्णभेदी डंका सध्या वाजवला जात आहे. तथापि रस्त्यांवर बेवारस फिरणाऱ्या सुमारे २० लाख रुग्णांची दुरावस्था आणि कोट्यावधींची मानसोपचारांच्या अभावी होणारी परवड आपल्या माणुसकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते, असे प्रतिपादन डॉ. भरत वटवानी यांनी केले.

जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून स्नेहालय संस्थेच्या मानसग्राम प्रकल्पाच्या ५ एकर क्षेत्रावर ४५ हजार चौरस फुटांच्या नूतन संकुलाचे लोकार्पण झाले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे, रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित मानसोपचार तज्ञ डॉ. वटवानी उपस्थित होते.

मागील ६ वर्षातील मानसग्राम प्रकल्पाची वाटचाल पाहता येथे पुढील दशकात मानसिक आरोग्याची पंढरी निर्माण होईल, अशी आशा डॉ. वटवानी यांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घारगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, प्रकल्प पालक दानिश शहा, तहसीलदार संजय शिंदे, नायब तहसीलदार अभिजीत वांडेकर आणि मानसिक आरोग्य क्षेत्रातील महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले संस्थाचालक आणि मानसोपचार तज्ञ उपस्थित होते.

# नागरिकांच्या न्यायहक्कासाठी 'पीपल्स'चा पुढाकार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारतीय लोकशाहीचे खरे बळ म्हणजे प्रत्येक नागरिकाला मुलभूत अधिकार न्याय मिळण्याचा घटनात्मक हक्क, मात्र आजही देशातील अनेक नागरिकांसाठी न्याय मिळविणे हे स्वप्नासारखे आहे. धरण बांधले पण कालवे न काढल्याने शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचले नाही. तसेच संविधानाने हक्क दिले पण न्याय पोहोचविण्याची कार्यक्षम साधनव्यवस्था निर्माण झाली नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन पीपल्स हेल्पलाईनच्या पुढाकाराने, स्थानिक लोकअधिकार याचिका प्रणाली हे एक क्रांतिकारक उपक्रम पुढे आणण्यात येत आहे.

# जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये उत्तम गुणवत्ता

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात; पोखरी हवेली येथील जिल्हा परिषद शाळेला भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये मोठी गुणवत्ता आहे. इंग्रजी शिक्षणाचे वारे सर्वत्र वाहत असले तरी महाराष्ट्रातील अनेक जिल्हा परिषद शाळांमधून अत्यंत गुणवत्तेचे शिक्षण दिले जात असल्याने पुन्हा मराठी शाळांकडे ओढा सुरू झाला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेने आपली गुणवत्ता अधिक वाढवल्यास त्यांचे विद्यार्थी अधिक यशस्वी होतील, असे प्रतिपादन बेस्ट ऑफ फाईव्हचे जनक तथा माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

पोखरी हवेली येथे जिल्हा परिषदेच्या शाळेला सदिच्छा भेट दिल्यानंतर ते बोलत होते. यावेळी समवेत डॉ. नारायण कोल्हे, गजानन घुले, मुख्याध्यापक एकनाथ साबळे, शिक्षक सोमनाथ मदने, सोमनाथ थिटमे, सचिन आगळे, कृष्णा गवांदे गोपीनाथ आगळे आदींसह विविध कार्यकर्ते उपस्थित होते.



माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी जिल्हा परिषद पोखरी हवेली शाळेने बांधलेल्या अद्यावत इमारतीची पाहणी केली. याचबरोबर अमृतवाहिनी संस्थेने दिलेल्या इंटरॅक्टिव्ह बोर्डची पाहणी केली. माजी शिक्षण मंत्री थेट वर्गात आल्याने सर्व विद्यार्थी भारावून गेले. टीव्हीवर दिसणारे साहेब आपल्या वर्गात आल्याने विद्यार्थी आनंदाने नाचू लागले. पुष्पगुच्छ व टाळ्यांच्या गजरात या चिमुकल्यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी अत्यंत सहजतेने लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी या चिमुकल्यांशी संवाद साधला.

यावेळी माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, सहजतेने कोणतीही गोष्ट न मिळाल्याने जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी आत्मनिर्भरता निर्माण होते. स्पर्धेमध्ये हे विद्यार्थी टिकून राहतात. आज यशस्वी झालेल्या व्यक्तींमध्ये जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकलेल्या व्यक्तिमत्त्वांची जास्त संख्या आहे.

डॉ. नारायण कोल्हे म्हणाले की, शिक्षकांची मेहनत आणि ग्रामस्थांचे सहकार्य यातून पोखरी हवेली शाळा ही नक्कीच आदर्शवत झाली आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी ग्रामीण शिक्षणाचा पॅटर्न अधिक विकसित केला असल्याचे ते म्हणाले. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सर्व विद्यार्थ्यांची संवाद साधतात सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून पुष्पगुच्छ देऊन व आनंदाने स्वागत केले.

> ### थोरातांना पाहून चिमुकले गेले हरकून
>
> माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात मधल्या सुट्टीमध्ये अचानक शाळेमध्ये आल्याने सर्व विद्यार्थी आनंदाने नाचू लागले. आमचे साहेब आले, आमचे साहेब आले, असे म्हणून सर्वांनी थोरात यांना गराडा घातला. यावेळी अनेकांनी हस्तांदोलन केले. तर शाळेचे सर्व इमारत व कामकाज पाहून मुख्याध्यापक, ग्राम व्यवस्थापन समिती ग्रामस्थ व सर्व शिक्षकांचे माजी मंत्री थोरात यांनी विशेष कौतुक केले.

# संपादकीय

## ओला दुष्काळ, आव्हानांचा सुकाळ

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्या तऱ्हेवाईक वागण्यामुळे उद्योगक्षेत्रात आणि देशांच्या अर्थकारणामध्ये मोठे तरंग उमटत असताना देशात तितक्याच तऱ्हेवाईक पावसाने धुमाकूळ घातला. पाहता पाहता अनेक भागांमध्ये पाणी वाढत गेले आणि अनपेक्षितपणे शेती पाण्यात गेली. अनेक ठिकाणी तर वर्षानुवर्षे किरकोळ पावसाची नोंद होत असलेल्या भागांमध्येही नद्या वाहिल्या. अशा अनेक ठिकाणी पाहता पाहता पिके पाण्याखाली जाऊन कोलाहल माजला. याचा थेट परिणाम आत्ताच्या घडीला पहायला मिळाला नसला तरी येत्या काळात अनेक सामाजिक, आर्थिक प्रश्नांच्या रुपात पहायला मिळू शकतो. बरे, असा परिणाम एखाद दुसऱ्या ठिकाणीच दिसला असे नाही तर थोड्या फार फरकाने अनेक राज्यांमध्ये पहायला मिळाला. त्या निमित्ताने राजकारण्यांचे, ज्येष्ठ-श्रेष्ठ नेत्यांचे पाय सामान्य बाधित शेतकऱ्यांच्या शेतजमिनीला लागले. अनेक प्रकारच्या आश्वासनांची देवघेव झाली. दरम्यान, अमेरिकेच्या वाढीव आयात शुल्कामुळे अनेक देशांच्या व्यापाराचे गणित बिघडू लागले. फक्त निर्यातभिमूख क्षेत्रांमध्येच नाही, तर अन्य क्षेत्रांमध्येही पडसाद उमटू लागले. उद्या घाईला येऊ शकणाऱ्या उद्योगचित्राचे जणू दर्शन घडू लागले. सध्या घरखरेदीच्या व्यवहारांमध्ये १५ ते २० टक्क्यांची वाढ दिसत असून प्रमुख शहरांमध्ये येत्या तिमाहीमध्ये दुप्पट वाढ दिसत आहे. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ही आश्वासक बाब आहे. दुसरीकडे, अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी औषधांवर शंभर टक्के आयात शुल्क लादण्याचा निर्णय घेतला असला, तरी भारताच्या दृष्टीने त्याचे परिणाम मर्यादित राहतील, असा विश्वास या क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला. याचे कारण, त्यांचा आदेश हा केवळ स्वामित्व हक्क, म्हणजेच पेटंट आणि नाममुद्रित, म्हणजेच ब्रँडेड औषध उत्पादनांनाच लागू होणार आहे. भारतीय कंपन्यांकडून निर्यात होत असलेल्या जेनेरिक औषधांवर आयात शुल्काचा कोणताही परिणाम होणार नाही. या पार्श्वभूमीवर आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मजबूत देशांतर्गत मागणीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेची धाव कायम राहील, असा आशावाद एसअँडपी ग्लोबलने व्यक्त केला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून पुढेही व्याजदरात माफक कपात केली जाण्याची शक्यता आहे. चालू आर्थिक वर्षासाठी भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा ६.५ टक्के राहणार असल्याचे 'एसअँडपी'चे अनुमान आहे. मुख्यतः हंगामी पाऊस मोठ्या प्रमाणात अनुकूल असल्याने देशांतर्गत मागणी वाढली आहे. परिणामी, चालू आर्थिक वर्षासाठी महागाई दराचा अंदाज ३.२ टक्क्यांपर्यंत कमी करणाऱ्या रिझर्व्ह बँकेकडून आगामी पतधोरण बैठकीत रेपो दरात २५ आधारबिंदूंची कपात केली जाईल, अशी अपेक्षा आहे.

सरलेल्या एप्रिल-जून २०२५च्या तिमाहीमध्ये देशाचे सकल देशांतर्गत उत्पादन अर्थात जीडीपीवाढीचा दर ७.८ टक्के होता. त्यामुळे ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात विकासदर ६.५ टक्क्यांवर राहू शकेल. अनुकूल मान्सून, त्या परिणामी वाढलेले उत्पन्न, वस्तू आणि सेवा करात झालेली कपात आणि सरकारी गुंतवणुकीला मिळालेली गती यामुळे देशांतर्गत मागणी मजबूत राहील, असे दिसते. अन्नधान्याच्या महागाईत अपेक्षेपेक्षा जास्त घट झाल्यामुळे चालू वर्षात भाववाढ कमी राहण्यास मदत होईल. महागाई आटोक्यात असल्यामुळे रिझर्व बँकेला पतधरणाच्या म ध्यमातून टप्प्याटप्प्याने रेपोदरात कपात करण्यास वाव आहे. परिणामी, चालू आर्थिक वर्षात आणखी २५ आधारबिंदूंची कपात होण्याची अपेक्षा आहे. देशांतर्गत मागणी मजबूत असल्याने, अमेरिकेकडून आयातशुल्कात करण्यात आलेली वाढ आणि मंदावलेल्या जागतिक वाढीनंतरही बाय अडचणींचा परिणाम अत्यंत असेल, असे एकूण चित्र आहे. मात्र गेल्या दोन महिन्यांमध्ये महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे तब्बल २७ लख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. एकूण १९५ तालुक्यांमधील शेतीपिके उद्ध्वस्त झाली आहेत. धाराशिव जिल्ह्यातील सव्वातीन लाख हेक्टरवरील पिके मातीमोल झाली आहेत. बीड, सोलापूर, परभणी वगैरे जिल्ह्यांमधील परिस्थितीदेखील बिकटच आहे. राज्यातील ३० जिल्ह्यांमधील शेती बाधित झाली आहे. सोयाबीनसारख्या पिकांची काढणी काही दिवसांमध्ये झाली असती. मात्र अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून नेला. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात सिंधपण्णा, डोंबरी आणि विद्रूपा नदीचा संगम शिरसमार्ग या गावात होतो. हे गाव महाराष्ट्रातील 'मोसंबी हब' म्हणून ओळखले जाते. तेथील तीन हजार एकरावरील मोसंबी पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून पाच हजार शेतकऱ्यांना २०० कोटी रुपयांचा फटका बसला आहे. येथील मोसंबी संपूर्ण देशात धाडली जातात. झाडावर फळे आली आणि सौदेही झाले. परंतु माल तोडायच्या आतच बागा उन्मळून पडल्या. पूर आणि पाण्यामुळे सगळीकडे चिखल झाला आणि पाहता पाहता शेकडो फळे गळून पडत चिखलात गेली. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग, भाजीपाला, भात, बाजरी, ज्वारी, कांदा, हळद आणि फळबागांचे नुकसान झाले आहे. नांदेड, बीड, सोलापूर, यवतमाळ आणि वाशिम हे सर्वाधिक नुकसान झालेले पाच जिल्हे आहेत. तिकडे पंजाबमधील रावी, बियास आणि सतलज नद्यांना आलेल्या पुरात शेकडो लोक विस्थापित झाले आणि तीन लाख एकरपेक्षा जास्त पिकांचे नुकसान झाले. ४२ हजार हेक्टर जमिनीवरील भातपिके हातातून गेली. त्याचप्रमाणे गहू, ऊस, मका या पिकांचीही हानी झाली आहे. या नुकसानीमुळे पंजाबमध्ये हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करण्यात आली असून महाराष्ट्रातही तेवढ्याच मदतीची मागणी केली जात आहे. मात्र यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, या सगळ्यामुळे देशातील धान्य वा अन्य शेतमालाचा पुरवठा कमी होणार असून अंदाजापेक्षा अधिक प्रमाणात महागाई वाढण्याची भीती आहे. हे लक्षात घेऊन केंद्र सरकारला राज्यांना मदत करताना आपल्या वित्तीय धोरणांची फेरआखणी करावी लागेल. जीएसटी कपातीने बाजाराची दिशा पालटल्याची वदंता ऐकायला मिळत आहे. बऱ्याच क्षेत्रांमध्ये नव्या जोमाने खरेदीयात्रा सुरु झाल्याचे सांगण्यात येत आहे. पण ताज्या घडामोडींच्या निमित्ताने 'आहे रे' आणि 'नाही रे' वर्गातील दरी वाढण्याची शक्यता आहे.

# अखंड साधनेची शताब्दी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उद्दिष्ट केवळ संघटनेपुरते मर्यादित नाही. समाजात नैतिक, सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्ये मजबूत करण्यासाठी, प्रत्येक व्यक्तीमध्ये शिस्त आणि समर्पण विकसित करण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीत योगदान देण्यासाठी संघ कार्य करतो. संघाचा दृष्टिकोन सम ावेशक आहे; तो कोणत्याही धर्माच्या, जातीच्या किंवा गटाच्या विरोधात नाही. समाजकार्याच्या अखंड साधनेची शताब्दी पार पडत असताना घेतलेला वेध.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समाजाला गटबाजीपासून मुक्त करण्यासाठी आणि विविधतेत एकता स्थापित करण्यासाठी कार्य करतो. संघाचा शंभर वर्षांचा प्रवास हा या समर्पणाचा आहे. संघाची स्थापना भारताला केंद्रस्थानी ठेवून करण्यात आली होती आणि राष्ट्राच्या जागतिक स्तरावरील उदयाला हातभार लावण्याचे संघाचे उद्दिष्ट आहे. संघाची प्रार्थना आणि 'भारत माता की जय' हे केवळ शब्द नाहीत, तर कृती आणि समर्पणाची प्रेरणा आहे. संघाची निर्मिती ही काळाच्या कसोटीवर उतरलेल्या संथ आणि सततच्या प्रक्रियेचा परिणाम आहे. संघ 'हिंदू' हा शब्द वापरत असला, तरी त्याचे सार धर्मापुरते मर्यादित नाही. ते समावेशकता, मानवता आणि राष्ट्राप्रती जबाबदारीच्या भावनेला मूर्त रूप देते. संघाचे उद्दिष्ट विरोध करणे किंवा स्पर्धा करणे नाही, तर समाजाच्या प्रत्येक घटकाला संघटित करून राष्ट्राची एकता राखणे हे आहे. संघाचे कार्य स्वयंसेवकांद्वारे केले जाते आणि हे कार्य नवीन स्वयंसेवकांना प्रशिक्षित करण्यासाठी आणि त्यांच्यात नेतृत्व आणि जबाबदारी विकसित करण्याच्या संधी प्रदान करते. राष्ट्राची संकल्पना शक्ती सरकारद्वारे परिभाषित केलेली नाही. भारतीय परंपरेत, राष्ट्राचा अर्थ संस्कृती, आत्मचिंतन आणि सामाजिक जाणीवेशी जोडलेला आहे. इतिहासाकडे पाहिल्यास हे स्पष्ट होते, की १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध अयशस्वी झाले असले तरी त्यामुळे भारतीय समाजात एक नवचेतना आणि आत्म-जागरूकता निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतरही समाजात निर्माण झालेली असमानता आणि दुष्कृत्ये दूर करण्याचे आव्हान कायम राहिले. या गरजेमुळे संघाची स्थापना आणि भूमिका निर्माण झाली.

**नोंद**

**- आमदार अमित गोरखे**

डॉ. केशव बळीराम हेडगेवार आणि इतर म हापुरुषांनी सामाजिक दुष्कृत्ये दूर करण्याची आणि संपूर्ण समाजाचे संघटन करण्याची गरज ओळखली. समाजाच्या नैतिक आणि सांस्कृतिक मूल्यांना बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीत त्याचे योगदान सुनिश्चित करण्याच्या दृष्टिकोनातून १९२५ मध्ये संघाची स्थापना झाली. हिंदू हा शब्द केवळ एक धर्म नाही तर जबाबदारी, समर्पण आणि समावेशाचे प्रतीक आहे. तो बहिष्कार किंवा विरोध दर्शवत नाही, तर समाजाला एकत्र आणण्याचे आणि संघटित करण्याचे काम करतो. भारताचे स्वरूप सहकार्य आणि समन्वयाचे आहे, संघर्षाचे नाही. त्याची एकता भूगोल, संसाधने आणि आत्मनिरीक्षणाच्या परंपरेत आहे. बाह्याऐवजी अंतर्मनाकडे पाहिल्यास हे स्पष्ट होते, की सर्वांमध्ये एक समान सार आहे... ते वेगवेगळ्या स्वरूपात प्रकट झाले तरीही. म्हणूनच भारतमाता आणि आपले पूर्वज आपल्याला आदरणीय आहेत. भारतमाता आणि त्यांच्या पूर्वजांचा आदर करणारी व्यक्ती खरी हिंदू आहे. शब्द बदलू शकतात; परंतु भक्ती आणि श्रद्धेची भावना समाजातील प्रत्येक व्यक्तीला एकत्र करते. हळूहळू, समाजातील लोक संघ आणि हिंदू या शब्दांचा अर्थ समजू लागले आहेत. जीवनाचा दर्जा सुधारत असताना, लोक त्यांच्या मूळ परंपरांकडे परत येतात.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कोणालाही हिंदू होण्यास भाग पाडत नाही. त्याचे उद्दिष्ट समाजाच्या एकूण संघटनेत आणि राष्ट्रनिर्माणात योगदान देणे हे आहे. संघ कोणत्याही धर्माच्या, जातीच्या किंवा गटाच्या विरोधात नाही, तर सर्वसमावेशक दृष्टिकोनाने सम ाजाला एकत्र आणतो. संघाचे कार्य केवळ संघटनेपुरते मर्यादित नाही. त्याचे ध्येय समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये नैतिक, सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्ये विकसित करणे हे आहे. समाजात जागरूकता आणि शिस्त हे संघाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. वैयक्तिक समर्पण आणि शिस्त त्याच्या कार्यपद्धतीत महत्त्वाची भूमिका बजावते. प्रत्येक स्वयंसेवक संघाच्या मूळ भावनेला आणि कार्यशैलीला आत्मसात करतो आणि समाजात अंमलात आणतो. समाजातील गटबाजी दूर करणे हे संघाचे ध्येय आहे. त्याचबरोबर सर्वांना एकत्र करणे आणि देशात एकता राखणे हे ही संघाचे उद्दीष्ट्य आहे. विविधतेतील एकता ही भारताची खरी ओळख आहे. विविध भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरा असूनही, भारताची ओळख त्याच्या आत्म्यात, संस्कृतीमध्ये आणि पूर्वजांबद्दलच्या आदरात आहे. संघाचे उद्दिष्ट ही एकता टिकवून ठेवणे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला सहभागी करून घेणे हे आहे. संघाचे कार्य तीन स्तरांवर चालते. वैयक्तिक विकास, सामाजिक उत्थान आणि राष्ट्रनिर्माण. संघाच्या माध्यमातून समाजात नैतिक आणि सांस्कृतिक मूल्ये बळकट केली जात आहेत. संघाच्या कार्यकर्त्यांद्वारे संघ समाजात शिस्त, समर्पण आणि सेवेची भावना निर्माण करतो. संघाचे उद्दिष्ट स्वयंसेवकांपुरते मर्यादित नाही, तर समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट्य आहे.

संघाची कार्यशैली वैयक्तिक प्रयत्न आणि संघटनात्मक दृष्टिकोन यांच्यात संतुलन राखते. संघाचे ध्येय म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपली कर्तव्ये समजून घ्यावीत आणि राष्ट्रनिर्माणात योगदान द्यावे. संघाचं कार्य वैयक्तिक समर्पण, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीद्वारे समाजाचे संघटन करणे हे आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शंभर वर्षांचा प्रवास हा एका धाडसाची एक भव्य गाथा आहे. १९२५ मध्ये नागपूरच्या पवित्र भूमीत डॉ. हेडगेवार यांनी लावलेले छोटेसे बीज आज भारताच्या सांस्कृतिक भूदृश्याला व्यापून वटवृक्ष बनले आहे. हा केवळ एका संघटनेचा उत्सव नाही, तर 'सर्वे भवन्तु सुखिन:' या शब्दांना जिवंत करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या जीवनदृष्टीचा उत्सव आहे. हे शताब्दी वर्ष केवळ संघाचे नाही, तर एका कल्पनेचा उत्सव आहे, जो आपल्याला 'वसुधैव कुटुंबकम' या भारतीय भावनेला जिवंत ठेवण्यासाठी प्रेरणा देतो. संघाची ही प्रथा कोणत्याही संघटनेचे वैयक्तिक ध्येय नाही, तर भारताच्या आत्म्याचे बलिदान आहे. राष्ट्रीय प्रगती सत्ता परिवर्तनातून, केवळ आर्थिक प्रगतीतून नाही, तर समाजात जागृत झालेल्या सामूहिक चेतनेतून येते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपलेपणाची भावना मिळते. हा असा मार्ग आहे, ज्यावर भारत जगाला केवळ एक नवी दिशा देऊ शकत नाही, तर त्याच्या शाश्वत संस्कृतीच्या प्रकाशात त्याचे भविष्यदेखील उजळवू शकतो.

प्रत्येक नागरिक स्वतःमध्ये लपलेली सेवा आणि सद्भावनेची ज्योत प्रज्वलित करतो, तेव्हाच खरी राष्ट्रीय प्रगती शक्य आहे. संघाची ही पद्धत काळ, सम ाज आणि नवीन दृष्टिकोनाच्या त्याच दिव्याचा विस्तार आहे. संघाची शताब्दी ही केवळ संघटनेचा उत्सव नाही तर भारताच्या सांस्कृतिक जाणीवेचा उत्सव आहे. ही लाखो स्वयंसेवकांच्या समर्पण आणि कठोर परिश्रमांना श्रद्धांजली आहे, ज्यांनी प्रसिद्धीची कोणतीही इच्छा न बाळगता राष्ट्राला बळकट करण्यासाठी काम केले. अखंड भारताचे स्वप्न भौगोलिकदृष्ट्या दूरचे वाटू शकते; परंतु सांस्कृतिक अखंडता आणि स्वाभिमानाची ज्योत पूर्वीपेक्षा अधिक तेजस्वी आहे. डॉ. मोहन भागवत यांच्या नेतृत्वाखाली संघ संवाद, समावेशकता आणि आधुनिकतेच्या संगमावर उभा आहे. हे शताब्दी वर्ष आपल्याला आठवण करून देते, की भारताचा आत्मा केवळ भूतकाळातच नाही, तर भविष्याच्या आकाशातही तेजस्वी आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा एक दिवा आहे, जो प्रकाश पसरवतो. काळाच्या प्रत्येक वादळात स्थिर राहतो आणि म्हणतो, 'वसुधैव कुटुंबकम, दयाळू जग हे आपले कुटुंब आहे.' राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आपल्या शताब्दी वर्षाकडे वाटचाल करत आहे. १९२५ मध्ये डॉ. हेडगेवार यांनी स्थापन केलेली ही संघटना आज जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी सांस्कृतिक संघटना मानली जाते. आपल्या शंभर वर्षांच्या प्रवासात, संघाने भारतीय समाज, राजकारण, संस्कृती आणि राष्ट्रीय जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक पैलूवर एक ना अनेक प्रकारे प्रभाव पाडला आहे. हा प्रसंग संघासाठीच नाही, तर भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनासाठीदेखील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

पान १ वरून

## कर्जाचे पुनर्गठन नको, कर्जमुक्ती हवी

अधिकार असतात. त्याला सरकारला प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो. त्यानंतरही तुम्ही विरोधकांना हे पद द्यायला तयार नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणाले, सरकारने लाडक्या बहिणींचा सप्टेंबरचा हप्ता आज ऑक्टोबरमध्ये टाकला आहे. निवडणुकीवेळी त्यांनी ३-४ महिन्यांचे हप्ते एकाचवेळी दिले होते. या लोकांनी या योजनेतही पैसे खाल्लेत. व्होट चोर गद्दी छोड, अशी घोषणा दिल्यानंतर या बुडाला आग लागली. त्यामुळे कुणीही प्रस्ताव न देता पंतप्रधानांनी स्वतः बिहारच्या महिलांच्या खात्यात १० हजार रुपये टाकलेत. मग माझ्या महाराष्ट्राने काय घोडे मारले. बिहारला मदत केली म्हणून आमचा पोटशुळ उठण्याचे कारण नाही. पण तुम्ही भाजपचे नव्हे तर संपूर्ण देशाचे पंतप्रधान आहात. निवडणूक असो किंवा नसो तुम्ही संपूर्ण देशातील महिलांच्या खात्यात प्रत्येकी १० हजार रुपये का टाकत नाहीत? असे उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणाले, शेतकऱ्यांनी आतातरी डोळे उघडावेत. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत आहेत. हे आता तुमचे तोंड गप्प करत आहेत. पण नंतर ते तुमच्यापुढे गुडघे टेकतील. हे सरकार शेतकऱ्यांच्या मार्गात खिळे टाकणारे नतदृष्ट सरकार आहे. आपण त्यांच्याकडे दाद मागत आहोत. आज महाराष्ट्रात निवडणूक नाही म्हणून केंद्र सरकार मदत करत नाही. पण निवडणूक आली की मग मोदी बघा, कसे घोषणा करतात. आज विधानसभेची निवडणूक नाही, तरी शिवसेना तुमच्यासोबत आहे.काही शेतकरी नियमित कर्जाची परतफेड करतात. त्यांना आम्ही प्रोत्साहन म्हणून आम्ही ५० हजार रुपये देण्याची घोषणा केली होती. पण नंतर कोरोना आला. या कोरोनामुळे हे पैसे देता आले नाही. त्यानंतर आम्ही हे पैसे देण्यास सुरुवात केली. पण हे खोकेवाले खोके घेऊन पळाले आणि आपले सरकार पाडले. त्यानंतर आता हे डोक्यावर बसलेत. हे डोक्यावर बसले नसते तर मी ५० हजार तर दिलेच असते, पण याहीवेळी मी कर्जमुक्त करून दाखवले असते. आज कोणत्याही एका धर्माच्या व्यक्तीवर संकट आले नाही. ते सर्वांवर आले आहे.

## कबूतर, गाय राष्ट्रीय प्राणी घोषित करा

होता, त्यामुळे पक्ष्यांचे महत्त्व रामायणकाळापासूनच सिद्ध झाले आहे. आज त्या रामाच्या भूमीत पक्ष्यांवर अन्याय होत असेल, तर ते असह्य आहे, असेही ते म्हणाले. पुढे ते म्हणाले की, मी डॉक्टरांना पण मूर्ख मानतो. दोन कबूतरे मेल्याने काय होते? रोज शेकडो सामान्य माणसे मरतात, त्यांचा सरकार विचार करत नाही. पण इथे कबूतरांमुळे आजार होतो असे सांगून खोटे चित्र तयार केले जाते. हे सर्व धर्मद्रोही षडयंत्र आहे. मंत्री मंगलप्रभात लोढा आज धर्मसभेत आले नाहीत, यावरून सरकार आणि काही उद्योगपतींची मिलीभगत स्पष्ट होते, असा आरोप त्यांनी केला. या धर्मसभेत स्वरूपानंदजी महाराज यांनी सरकारला थेट इशारा दिला. जर आमच्या प्राण्यांवर हल्ला झाला, तर आम्ही मौन धारण करणार नाही. त्यांना वाचवण्यासाठी शस्त्र उचलावे लागले तरी आम्ही मागे हटणार नाही. आज जे सत्तेत आहेत त्यांना साधुसंतांनीच बसवले आहे. आम्ही घराघरांत जाऊन प्रचार केला, आणि त्यातूनच देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. जर साधुसंतांच्या भावनांशी खेळाल, तर आम्ही रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

## विकास कागदावर नव्हे, जमिनीवर दिसायला हवा

प्रकल्पांची पाहणी केली. यावेळी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. अजित पवार यांनी वारजेतील चौधरी चौक येथून पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुर्दशा, आणि नागरिकांच्या तक्रारी या विषयांवर त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. विकासकामे वेळेत पूर्ण झाली पाहिजेत, नागरिकांना अडचण होणार नाही याची दक्षता घ्या, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. आहिरेगाव परिसरात नागरिकांनी विविध तक्रारी मांडल्या. यावेळी स्थानिकांनी त्यांना मंदिरात येण्याचे निमंत्रण दिले असता अजित पवार म्हणाले, मी पहाटे पाच वाजता उठतो. एकतर मला देव-देव करायला लावा किंवा विकासकामे करायला सांगा, या वक्तव्याने नागरिकांमध्ये हशा पिकला, पण त्यातून त्यांनी विकासकामाला प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले. खडकवासला परिसरात पीएमआरडीएचे अधिकारी वेळेवर न आल्यामुळे अजित पवारांनी नाराजी व्यक्त केली. वसईकर, कुठे जाऊन बसता हो तुम्ही? असे म्हणत त्यांनी संबंधित अधिकाऱ्याची सर्वांसमोर कानउघडणी केली. दोन मिनिटे उशीर म्हणजे उशीरच, असे सांगत वेळेच्या शिस्तीबाबतही त्यांनी इशारा दिला.

## कोपरगाव मतदारसंघात ग्रामपंचायतीच्या इमारती होणार

प्रत्येकी २० लाख असा एकूण १ कोटी १५ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याबद्दल कोळपेवाडी, सुरेगाव, घारी, घोयेगाव व पढेगाव या गावातील नागरीकांनी आ. काळे यांचे आभार मानले आहे. यापूर्वीही कोपरगाव मतदार संघातील जुन्या झालेल्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीसाठी निधी मिळावा, यासाठी त्यांनी केलेल्या पाठपुराव्यातून महायुती शासनाकडून धारणगाव, धोत्रे, मुर्शतपूर, जेऊर पाटोदा, दहेगाव बोलका, करंजी बु., शिंगणापूर व चासनळी ह्या आठ गावांच्या नवीन ग्रामपंचायत इमारत बांधण्यासाठी प्रत्येकी २५ लाख याप्रमाणे एकूण २ कोटी रुपये निधी मिळविण्यात आ. काळे यशस्वी झाले आहेत व पुन्हा एकदा १ कोटी १५ लाख निधी पाच ग्रामपंचायत कार्यालयाच्या नूतन इमारतीसाठी त्यांनी मिळविला आहे. आ. आशुतोष काळे यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शेवटच्या स्तरावर काम करणारी संस्था असलेली ग्रामपंचायत ग्रामीण भागातील नागरीकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची संस्था आहे. नागरीकांना आरोग्य, शिक्षण, रस्ते, स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, तसेच जन्म-मृत्यूच्या नोंदी ठेवणे अशा अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळणाऱ्या ग्रामपंचायतीला सर्व सुविधांयुक्त इमारत असणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून नागरीकांना देखील सर्व प्रकारच्या सोयी सुविधा पुरविणे सहज शक्य होते व ग्रामविकास अधिकारी, सरपंच, उपसरपंच, सदस्य यांना देखील कामकाज करतांना अडचणी येत नाही. त्यासाठी आजवर मतदारसंघातील अनेक ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतीसाठी निधी दिला असून यापुढील काळातही ज्या ज्या ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतीची मागणी केली जाईल, त्या त्या ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतीसाठी निधी मिळवून देणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

पान १ वरून

पान १ वरून

## ३० दिवसांत होणार, जमिनींची मोजणी

मंत्री बावनकुळे म्हणाले, राज्यात आता खासगी भूमापक येणार आहेत. हे भूमापक शासनाच्या 'रोवर' प्रणालीवर काम करतील. ते मोजणी पूर्ण केल्यानंतर सिटी सर्वे ऑफिसर त्याची पडताळणी करून प्रमाणपत्र देईल. यामुळे मोजणी प्रक्रियेत गती येईल आणि नागरिकांचा त्रास मोठ्या प्रमाणावर कमी होईल. आतापर्यंत जमिनीच्या मोजणीसाठी ९० ते १६० दिवस लागत होते. मात्र, नव्या निर्णयामुळे ही प्रक्रिया ३० दिवसांत पूर्ण होईल. या प्रणालीमुळे खरेदीखत, फेरफार, लेआऊट मंजुरी यासारख्या महत्त्वाच्या प्रक्रियांत पारदर्शकता येईल, असेही ते म्हणाले. राज्यात दररोज २५ ते ३० हजार मोजणीचे अर्ज येतात. सध्या साडेतीन कोटी नागरिकांच्या जमिनींच्या मोजणीचे काम प्रलंबित आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर खरेदीखते, पोटहिस्से, गुंठेवारी आणि गृहनिर्माण प्रकल्प होत आहेत. त्यामुळे मोजणीच्या कामाचा प्रचंड ताण महसूल विभागावर आहे, असे बावनकुळे म्हणाले. खरेदीखत करताना मोजणी पूर्ण झालेली असली, तर दस्तऐवजात चुका होणार नाहीत. पण आता थेट खरेदीखत केल्याने क्षेत्रफळात तफावत राहते आणि ती कायमस्वरूपी राहते. त्यामुळे नागरिकांचे नुकसान होते. नव्या पद्धतीने हे प्रश्न सुटतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. मंत्री बावनकुळेंनी स्पष्ट केले, राज्याचे संपूर्ण मॅपिंग आमच्याकडे आहे. नागरिक अर्ज करतात, तेव्हा आम्ही त्यांना नकाशा देतो. खासगी भूमापक आमच्या रोवर तंत्रज्ञानावरून मोजणी करेल. त्या डेटाची पडताळणी आमचा सिटी सर्वेयर करेल आणि शेवटी प्रमाणपत्र दिले जाईल. खासगी मोजणीदार स्वतः प्रमाणपत्र देणार नाही, अंतिम मान्यता शासनाकडूनच मिळेल. नागरिकांना वारंवार कार्यालयांची धावपळ करावी लागू नये, म्हणून ही नवी प्रणाली आणली आहे. हे फक्त प्रशासनिक सुधारणा नाहीत, तर जमिनीशी संबंधित सर्व व्यवहार अधिक पारदर्शक आणि कायदेशीर करण्याचे पाऊल आहे, असे मंत्री बावनकुळे म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार या संदर्भात कायद्यात दुरुस्ती आणि नवीन नियमावली तयार केली जाईल. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशप्रमाणे महाराष्ट्रातही जिल्हानिहाय परवानाधारक खासगी भूमापकांची इम्पॅनलमेंट केली जाईल. या भूमापकांसाठी तांत्रिक पात्रता आणि पात्रतेची निकष ठरवली जातील. अर्ज मिळाल्यानंतर ३० दिवसांच्या आत मोजणी पूर्ण करून, नंतरच खरेदीखत आणि फेरफार प्रक्रिया करायची, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

## शिवशक्ती-भीमशक्तीचा आज मोर्चा

असून, मार्केटयार्ड चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पंचपीर चौक, सर सेनापती तात्या टोपे चौक, तुळशी दरवाजा, माणिक चौक, कापडबाजार, तेलीखुंट चौक, चितळे रोड, चौपाटी करंजा मार्गे हा मोर्चा दिल्लीगेट येथे पोहोचेल.

दिल्लीगेट येथे मोर्चाची सांगता सभा होणार असून, या सभेला आमदार संग्राम जगताप, सागर बेग आणि ॲड. वाल्मिक निकाळजे हे मार्गदर्शन करणार आहेत. मोर्चाच्या तयारीसाठी शहरात कार्यकर्त्यांनी कंबर कसली असून, सर्व समाजघटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दरम्यान, पोलिसांनी सुरक्षेची सर्वतोपरी तयारी केली असून वाहतूक व्यवस्थेत बदल करण्याची शक्यता आहे. नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सरकार शेतकऱ्यांच्या जखमेवर चोळतेय मीठ : नाना पटोले

प्रकारे भ्याड हल्ला झाला, तो अत्यंत निंदनीय आहे. मात्र, या घटनेनंतर केंद्र सरकारने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झालेला नाही. हे सरकार मौन का बाळगतेय? पंतप्रधान मोदी, मोहन भागवत आणि भाजपचे वरिष्ठ नेते का काही बोलत नाहीत? कारण हे कृत्य त्यांच्या माध्यमातूनच झाले आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस नेते पटोले यांनी केला. त्यांनी भाजपवर संविधान आणि न्यायव्यवस्थेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत लोकशाहीला धोका निर्माण होत असल्याचा इशाराही दिला.

राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत, कर्जाचा बोजा वाढत चाललाय, पण सरकार मात्र घोषणांवरच थांबले आहे, अशी टीका पटोले यांनी केली. भाजप आणि महायुती हे दोन्ही शेतकरीविरोधी आहेत. शेतकऱ्यांना मदत करू शकत नाही, तर निदान त्यांच्या वेदनांवर मीठ तरी चोळू नका, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

आ. पटोले म्हणाले की, महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होणारे राज्य आहे. राज्यातील परिस्थिती गंभीर असून, सरकार केवळ राजकारणात व्यस्त आहे. शेतकऱ्यांची दु:खं कमी करण्याऐवजी भाजप समाजात द्वेष आणि जातीयतेचे विष पेरत आहे. संविधान, न्यायव्यवस्था आणि लोकशाही यांच्यावर हल्ला करणाऱ्या या विचारसरणीला जनता आता नक्कीच उत्तर देईल, असा इशारा देत पटोले यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

## शिवपुराण कथा ऐतिहासिक अध्यात्मिक सोहळा ठरणार

यासाठी सुध्दा विशेष यंत्रणा कार्यान्वित केले असल्याचे त्यांनी सांगितले. भाविकांची संख्या वाहतूक व्यवस्था यामुळे नगर-मनमाड मार्गावरील वाहतूकीला कोणतीही अडचण होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल. मात्र परिस्थिती पाहून वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येईल. एवढ्या मोठ्या नियोजनात थोड्या त्रूटी राहाण्याची शक्यता आहे. मात्र येणारे भाविक स्थानिक व्यावसायिक आणि नागरिक या सर्वानी शिर्डीच्या अध्यात्मिक भूमीत होत असलेला सोहळा आपल्या परिवारातील आहे, असे समजून सहकार्य करण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले आहे. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर होत असलेला अध्यात्मिक सोहळा आपल्या सर्वासाठी तसेच प्रशासनासाठी नियोजनाच्या दृष्टीने अनुभव ठरेल, अशी अपेक्षा मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली.

दरम्यान पंडीत प्रदीप मिश्रा महाराजांचे दुपारी चार वाजता शिर्डी विमानतळावर आगमन झाले.डॉ सुजय विखे पाटील महाराजांना आणण्यासाठी स्वता भोपाळ येथे गेले होते. मंत्री विखे पाटील यांनी त्यांचे विमानतळावर स्वागत केले. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, विनायक देशमुख यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सरकारने जाहीर केलेली मदत फसवी

## माजीमंत्री थोरात; उत्तर महाराष्ट्रातील काँग्रेस कार्यकर्ता बैठक



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर:** राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, सरकारने तत्काळ त्यांच्या पाठीशी उभे राहून संपूर्ण कर्जमाफी करावी, अशी जोरदार मागणी काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे. सध्या सरकारने जाहीर केलेली मदत आणि आकडेवारी ही फसवी असून, त्यातून शेतकऱ्यांचे काहीही भले होणार नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

नाशिक रोड येथे आयोजित उत्तर महाराष्ट्रातील काँग्रेस कार्यकर्ता बैठकीत बोलत होते. यावेळी महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार डॉ. शोभा बच्छाव, माजी आमदार शिरीष कोतवाल, बी. एम. संदीप, आकाश छाजेड, हनीफ बशीर, गणेश पाटील, मुन्ना ठाकूर, डॉ. सचिन सावंत, राजाराम पानगव्हाणे, शरद आहेर, रईस शेख, ॲड. संदीप पाटील, प्रा. ज्ञानेश्वर गायकवाड, राहुल दिवे, शाहू खैरे, गौरव सोनार, माया काळे, उद्धव पवार, स्वाती जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

थोरात म्हणाले की, अतिवृष्टीने शेतकरी उध्वस्त झाला आहे आणि नागरिक हवालदिल झाले आहेत. महाविकास आघाडी सरकारने विना अट दोन लाख रुपयांची कर्जमाफी केली होती. परंतु, सध्याच्या सरकारने निवडणुकीत दिलेले संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन आता पाळण्याची खरी गरज आहे. शेतकऱ्यांना प्रति एकरी पुरेशी मदत जाहीर करून त्यांना संकटातून उभे राहण्यास पाठबळ द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

# राहात्यात कांद्याला १८०० रुपये भाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** – राहाता बाजार समितीत शुक्रवारी कांद्याला १८०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला.



कांद्याच्या ७९४१ गोण्यांची आवक झाली. कांदा नंबर १ ला १४०० रुपये ते १८०० रुपये भाव मिळाला. नंबर २ ला ९०० ते १३५० रुपये भाव मिळाला. नंबर ३ ला ४०० ते ८५० रुपये भाव मिळाला. गोल्टी कांद्याला ६०० रुपये ते ११०० रुपये भाव मिळाला. जोड कांद्याला १५० रुपये ते ३०० रुपये भाव मिळाला. डाळिंबाच्या २६१५ कॅरेटची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला १७१ रुपये ते २५५ रुपये भाव मिळाला. नंबर २ ला १०१ रुपये ते १७० रुपये भाव मिळाला. नंबर ३ ला ५१ रुपये ते १०० रुपये भाव मिळाला. नंबर ४ ला १० रुपये ते ५० रुपये भाव मिळाला. पेरूच्या ३५ कॅरेटची आवक झाली. पेरूला प्रतिकिलोला २० ते ३० रुपये तर सरासरी २५ रुपये भाव मिळाला.

५०१ जास्त सीताफळाची क्रेट्सची आवक झाली. सीताफळाला किमान ५ रुपये, जास्तीत ५५ रुपये भाव मिळाला. संत्रीची ९ क्रेट्सची आवक झाली. संत्रीला १० ते २० रुपये तर सरासरी १५ रुपये प्रतिकिलोला भाव मिळाला. ड्रॅगन फ्रुटची १६२ कॅरेटची आवक झाली. ड्रॅगन फ्रुटला २० ते ८५ रुपये भाव मिळाला, अशी माहिती सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

# ‘ओएसिस’चे बास्केटबॉल स्पर्धेत यश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर-** शहरातील ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय शालेय बास्केटबॉल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकाविले. १७ वर्षांखालील वयोगटातील या स्पर्धेत ओएसिस स्कूलच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी संघांना आपली ताकद दाखवून दिली. अंतिम सामन्यात समर्थ विद्यालयावर ३९ : १० गुणांनी दणदणीत विजय मिळवत ओएसिस स्कूलने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

विजयी संघाला प्रशिक्षक सुभाष कनोजिया व छबुराव कोतकर यांचे मार्गदर्शन लाभले. संघाच्या या यशामध्ये शाळेच्या डायरेक्टर वैशाली कोतकर, प्राचार्या कल्पना दारकुंडे, इन्चार्ज पांडुरंग गवळी व सुभाष पवार यांचेही मोलाचे योगदान लाभले. विजयानंतर शाळेचे अध्यक्ष भानुदास कोतकर व डायरेक्टर वैशालीताई कोतकर यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### शहराचे नाव उंचावले: कोतकर

वैशाली कोतकर म्हणाल्या की, ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही आघाडीवर आहेत. या स्पर्धेत मुलींनी दाखवलेली जिद्द, आत्मविश्वास आणि संघभावना कौतुकास्पद आहे. या विजयाने केवळ शाळेचेच नव्हे तर संपूर्ण शहराचे नाव उंचावले असल्याचे त्यांनी सांगितले.

# आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर

## कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या पुण्यतिथीचे निमित्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भातकुडगाव फाटा** -कर्मयोगी कॉम्रेड आबासाहेब काकडे यांची ४७ वी पुण्यतिथी आबासाहेब काकडे बी. फार्मसी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. हेमंत गांगुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर आयोजित करून साजरी करण्यात आली. परंपरेप्रमाणे याही वर्षी पुण्यतिथी सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य व सेवा उपक्रमांनी साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमाचे आयोजन आबासाहेब काकडे बी.फार्मसी महाविद्यालय, बोधेगाव येथे महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना आणि सिटी ब्लड सेंटर, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या कार्यक्रमप्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत गांगुर्डे, सिटी ब्लड बँकेचे सर्वेसर्वा डॉ. बाळासाहेब शेंडगे व त्यांची संपूर्ण टीम, तसेच आबासाहेब काकडे कला महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. कैलास पोटे व डॉ. भारत चव्हाण तसेच कार्यक्रम समन्वयक भारत जाधव आणि कमेश कदम यांचा समावेश होता. कार्यक्रम समन्वयक म्हणून भारत जाधव आणि कमेश कदम यांनी कार्यभार सांभाळला. डॉ. कैलास पोटे यांनी आबासाहेब काकडे यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच प्राचार्य डॉ. हेमंत गांगुर्डे यांनी रक्तदानाचे महत्त्व व आरोग्य संवर्धनाबद्दल सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना रक्तदानासाठी प्रोत्साहित केले.

# ‘अशोक’चा सोमवारी बॉयलर अग्निप्रदिपन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** – अशोक सहकारी साखर कारखान्याचा सन २०२५-२६ या ६९ व्या ऊस गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ सोमवार (दि.१३) रोजी दुपारी २ वा. कारखान्याचे चेअरमन माजी आ.भानुदास मुरकुटे यांच्या हस्ते तसेच महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे कार्याध्यक्ष अविनाश आपटे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.यासंदर्भात अधिक माहिती देताना कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासाहेब आदिक यांनी सांगितले की, अशोक सहकारी साखर कारखान्याचा सन २०२५-२६ या वर्षीचा गळीत हंगाम लवकरच सुरु होत असून त्यादृष्टीने ऑफ सिझनमधील देखभाल व दुरुस्तीची सर्व कामे पूर्ण झाली आहे. कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ सोमवार दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी २ वा. संपन्न होत आहे. या निमित्त कारखान्याचे संचालक पुंजाहरी शिंदे व त्यांच्या पत्नी सौ.सुवर्णाताई शिंदे तसेच असि. को-जन मॅनेजर सचिन पवार व त्यांच्या पत्नी सौ.शितलताई पवार या दाम्पत्यांचे हस्ते विधीवत पूजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी अशोक उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहे. सदर प्रसंगी कारखान्याचे सभासद, ऊस उत्पादक व हितचिंतक आदिंनी उपस्थित रहावे, असे आवाहन संचालक मंडळ व कार्यकारी संचालक संतोष देवकर यांनी केले आहे.

# स्वामी विवेकानंद पतसंस्थेला दीपस्तंभ पुरस्कार जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** -महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने प्रत्येक वर्षी देण्यात येणारा मानाचा दीपस्तंभ पुरस्कार यावर्षी राहाता येथील स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेला देण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य फेडरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेखा लवांडे यांनी पत्राद्वारे पतसंस्थेला दिली आहे.

राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनला प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून १० ते ५० कोटी रुपयांच्या ठेवी असलेल्या गटातून निवड समितीने स्वामी विवेकानंद पतसंस्थेची या पुरस्कारासाठी निवड केली आहे. १२ व १३ ऑक्टोबर रोजी कुमटा, कर्नाटक येथे संपन्न होणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. एकेकाळी बंद पडलेली पतसंस्था चेअरमन साहेबराव निधाने यांच्या नेतृत्वाखाली पूर्ववत झाली असून या संस्थेकडे आज रोजी २५ कोटी रुपयांच्या ठेवी असून संस्थेची यावर्षीची २७४ कोटींची उलाढाल आहे.

पतसंस्थेला मिळालेल्या या पुरस्काराबद्दल चेअरमन साहेबराव निधाने, व्हाईस चेअरमन राजेंद्र दंडवते, सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वृंद, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे, राहाता तालुका फेडरेशनचे अध्यक्ष राजेंद्र वाबळे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त माजी मुख्याध्यापक सर्जेराव मते आणि शहरातील नागरिक सभासद यांनी अभिनंदन केले आहे.

# ठेवीदारांचा विश्वास जपणे पतसंस्थांचे कर्तव्य

## मालपाणी; सहकार विकास महामंडळ आयोजित प्रशिक्षणाचा समारोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर**-ठेवीदारांचा विश्वास जपणे हे पतसंस्थांचे सर्वोच्च कर्तव्य आहे. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या पतसंस्था अधिकारी, पदाधिकारी आणि कर्मचारी यांच्या प्रशिक्षणातून पतसंस्थांचा कारभार अधिक दर्जेदार होईल आणि उज्वल भविष्याकडे वाटचाल होईल, असे प्रतिपादन सहकारी बँकिंगमधील ज्येष्ठ अभ्यासक आणि मालपाणी उद्योग समूहाचे अध्यक्ष राजेश मालपाणी यांनी केले.



व राज्यस्तरीय शिखर प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ अर्थात एमसीडीसी अहिल्यानगर जिल्हा सहकार उपनिबंधक यांनी संयुक्तरीत्या आयोजित केलेल्या संगमनेर आणि अकोले तालुक्यातील पतसंस्थांचे अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप सोहळ्यामध्ये प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना त्यांनी वरील विचार मांडले. यावेळी व्यासपीठावर प्रशिक्षण समन्वयक मयूर शेळके, पवन पाटील यांचेसह एमसीडीसीचे राज्य समन्वयक धनंजय डोईफोडे, सहकारी संस्था उपनिबंधक संगमनेर संतोष कोरे, सहकारी संस्था सहाय्यक निबंधक अकोले अमोल वाघमारे, संगणक तज्ज्ञ सहाय्यक प्रा. सीताराम कवडे उपस्थित होते.मालपाणी यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणामध्ये सहकारी पतसंस्थांच्या चळवळीचा सर्वंकष आढावा घेतला. मालपाणी हेल्थ क्लबच्या सभागृहात जमलेल्या सर्व संगमनेरमधील सुमारे १०० पतसंस्थांचे व्यवस्थापक, पदाधिकारी, कर्मचारी मालपाणी यांच्या भाषणाने प्रभावित झाले.

# ‘विद्यार्थ्यांमध्ये उपजत कलात्मकता असते’



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर-** विद्यार्थ्यांमध्ये उपजत कलात्मकता असते, असे प्रतिपादन येथील डाकले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी केले.

महाविद्यालयात आयोजित रांगोळी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होत. या स्पर्धेत ३६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून आपला मेहंदी कलेतील आविष्कार सादर केला. विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील, बदलते संगणक तंत्रज्ञान, पर्यावरण साक्षरता व महिला सबलीकरण इत्यादी विषयांवर रांगोळी सादर केली. स्पर्धेत प्रथम क्रमांक शिवानी बनकर व अंजली विधाते (एफ. वाय.बी.कॉम.), द्वितीय क्रमांक नेहा औटी व भाग्यश्री भिंगारदिवे (टी. वाय.बी. बी.ए.सी.ए.), तृतीय क्रमांक वैष्णवी कडू व नंदिनी संत (एस. वाय. बी.बी. ए.सी.ए.) तर उत्तेजनार्थ पारितोषिक मानसी काळे (टी. वाय.बी.बी.ए.सी.ए.) यांनी पटकावले. परीक्षक म्हणून प्रा. तस्नीमआरा शेख यांनी काम पाहिले. यावेळी उपप्राचार्य प्रो. डॉ. सादिक सय्यद, डॉ. अनिकेत खत्री, प्रा. योगीराज चंद्रात्रे उपस्थित होते. डॉ. सुविधा तावडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पौर्णिमा गुजर व प्रा. प्रियांका वहाडणे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# दादा पाटील महाविद्यालयाचे यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** - पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती निमित्त शासकीय औद्योगिक संस्था, कर्जत यांच्यावतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय वक्तृत्व, निबंध व पोस्टर सादरीकरण स्पर्धेमध्ये दादा पाटील महाविद्यालयातील किमान कौशल्य विभागाकडील विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन केले.

तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये गौरी राजेश कोकाटे प्रथम क्रमांक, निबंध स्पर्धेत दिपाली नवनाथ कांबळे, प्रथम व पायल मारुती गायकवाड द्वितीय क्रमांक तर पोस्टर सादरीकरण स्पर्धेत शीतल महादेव मोरे प्रथम क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थ्यांना किमान कौशल्य विभागाचे प्रमुख प्रा. राजेश दळवी, प्रा. विजय थोरात, प्रा. जयश्री कांबळे, शेजल बलदोटा यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालय विकास समिती, माजी विद्यार्थी संघ, प्राचार्य डॉ. संजय नगरकर, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक वर्ग यांनी अभिनंदन केले.

# मुख्याधिकारी कोकरेंची बढतीवर बदली

## शिवसेनेचे शहरप्रमुख फटांगरे यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागामार्फत राज्यातील अनेक मुख्य आधिकाऱ्यांना बढती देण्यात आली आहे, तब्बल ६५ मुख्याधिकाऱ्यांच्या नियुक्ती आदेशाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. त्यानुसार संगमनेर नगरपालिकेचे तात्कालीन मुख्याधिकारी रामदास कोकरे यांची बढतीवर बदली झाली आहे. त्यांच्या जागेवर मुख्याधिकारी म्हणून दयानंद गोरे हे नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहे. परंतु काहींनी जाणून बुजून याबाबत चुकीची माहिती पसरवली असल्याचा आरोप शिवसेनेचे शहरप्रमुख दिनेश फटांगरे यांनी केला आहे.

गोरे हे लवकरच पदभार स्विकारणार आहेत, ‘ते पारदर्शक कारभाराचे पाठीराखे असून, ते आल्यानंतर नगरपालिकेतील भ्रष्टाचार आणि दलालशाहीला निश्चितच लगाम बसणार आहे. कोकरे गेल्यामुळे काहींचे मनसुबे उधळले असल्याने काही जणांचा जळफळाट होत आहे. यापूर्वी संगमनेर नगरपालिकेत टी. टी. प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला ब्रेक लागला असल्यामुळे त्यांना दुःख झाले आहे. अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना घरची कामे सांगता येत नाही म्हणून काहीजण चुकीच्या पद्धतीने निराधार व खोटेवृत्त पसरवून जनतेची अनेक वर्षात अशी दिशाभूल केली आहे. संगमनेर उपविभागाचे प्रांताधिकारी शैलेश शिंगे यांच्या पदोन्नतीनंतर त्यांच्या जागी अरुण मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच मध्यंतरी तहसीलदार धीरज मांजरे हे आजारपणामुळे रजेवर गेले होते. त्यावेळी त्यांच्या जागेवर नायब तहसीलदार यांना प्रभारी तहसीलदार पदावर कार्यरत होते. तालुका पोलीस ठाण्याचे तात्कालीन पोलीस निरीक्षक देविदास ढुमणे यांच्या बाबत जनतेच्या अनेक तक्रारी झाल्याने त्यांची बदली करून त्यांच्या जागेवर पोलीस निरीक्षक पदावर प्रवीण साळुंखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# कन्या शाळांचे होणार सहशिक्षण शाळांमध्ये रुपांतर

## शिक्षण विभागाकडून प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर**-नगर जिल्ह्यात ३८ ठिकाणी स्वतंत्र कन्या शाळा आहेत. या ठिकाणी मुलांची देखील स्वतंत्र शाळा असून या दोन्ही शाळांचे आता एकत्रिकरण करण्यात येणार असून जिल्ह्यातील ३८ शाळांचे मुले आणि मुली एकत्रिकरण करण्यात येवून सहशिक्षण शाळा तयार करण्यात येणार आहे. याबाबतचे आदेश शालेय शिक्षण विभागाच्यावतीने काढण्यात आले असून त्यादृष्टीने नगर जिल्ह्यात कार्यवाही करण्याचे प्रस्ताव तयार करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्यातवीने सांगण्यात आले.



प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाल्यानंतर आता माध्यमिक स्तरावरील शिक्षणाच्या विकासाला आणि विस्ताराला गती मिळाली आहे. शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे मूलभूत साधन असल्यामुळे राज्याने सुरुवातीपासूनच स्त्री शिक्षणाला मोठे महत्त्व दिले आहे. याच धोरणातून राज्यात अनेक कन्याशाळा अस्तित्वात शिक्षणाची सोय सर्वदूर उपलब्ध झाल्याने, तसेच सामाजिक समानता आणि निकोप वाढीसाठी सहशिक्षणाचे धोरण स्वीकारण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने कन्याशाळांचे सहशिक्षण शाळेत रूपांतरित करण्याबाबत आदेश जारी केला आहे.

सहशिक्षणातून मुला-मुलींमध्ये समानतेचे वातावरण निर्माण होते. परस्पर आदर वाढतो आणि विद्यार्थ्यांना शाळेनंतर येणाऱ्या वैविध्यपूर्ण वास्तविक जगासाठी तयार करता येते. या भूमिकेतून सहशिक्षणाच्या शाळा चालवणे हे अधिक कालसुसंगत आहे.

### या तालुक्यात होणार सहशिक्षण शाळा

जिल्ह्यातील नेवासा, श्रीरामपूर, संगमनेर, पाथर्डी, अकोले, कर्जत, जामखेड, कोपरगाव, श्रीगोंदा, राहाता आणि राही या तालुक्यातील ३८ मुले आणि मुलींच्या शाळांचे एकत्रिकरण करून त्या ठिकाणी सहशिक्षण शाळा तयार करण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाच्या सुत्रांनी सांगितले.

# मुकादम-ऊस तोडणी कामगारांचा कारखान्याच्या नावलौकीकात मोलाचा वाटा

## शालिनीताई विखे पाटील; विखे कारखान्याच्या सभागृहात ३५० मुकादमांचा सत्कार



**जनता आवाज वृत्तसेवा**

**प्रवरानगर :** पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्यासाठी ऊस तोडणी कामगार पुरवणाऱ्या मुकादम आणि ऊस तोडणी कामगारांचा कारखान्याच्या नावलौकीकात मोलाचा वाटा असल्याचे गौरवोद्गार जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी काढले.

विखे कारखान्याचा डॉ.धनंजयराव गाडगीळ सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३५० मुकादमांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी ट्रक्स वाहतूक संस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर राठी, कारखान्याचे उपाध्यक्ष सोपानराव शिरसाठ, ट्रक्स वाहतूक संस्थेचे उपाध्यक्ष सुनील जाधव, कारखान्याचे कार्यकारी संचालक महेश कोनापुरे, कारखान्याचे संचालक, अधिकारी उपस्थित होते. प्रारंभी सर्व मुकादमांचा कारखान्याच्या वतीने सौ. विखे व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सौ. विखे पाटील म्हणाल्या की, पद्मश्री विखे पाटील, पद्मभूषण विखे पाटील, ना. राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे पाटील या चार पिढ्यासोबत कारखान्यासाठी ऊस तोडणी मजूर पुरवण्याचे काम अनेक मुकादमानी केले आहे.

कार्यकारी संचालक महेश कोनापुरे म्हणाले की, कारखान्याने ७६ वर्षांची अविरत वाटचाल केली आहे. देशात सर्वाधिक गाळप करणारा हा कारखाना होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जनरल मॅनेजर संजय मोरे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, १ नोव्हेंबरला यावर्षीचा हंगाम सुरू करण्याचे नियोजन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले आहे.

नवीन कारखाना सुरू होणार असल्याने सुरुवातीला ९ हजार मेट्रिक टन व एक आठवड्यानंतर ११ हजारांवर नेऊन पुढच्या काही दिवसात ११ हजाराने कारखाना चालेल. त्यासाठी मुकादमांनी त्या त्या भागातून ऊस तोडणी नियोजनाप्रमाणे होईल याकडे लक्ष द्यावे. कारखाना तुम्हाला चांगला व्यवसाय होण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करेल.

अनेक पिढ्यांपासून या कारखाण्यासोबत असलेल्या मुकादमांचे कारखाण्यासोबत दृढ नाते निर्माण झाले आहे. १५ लाखांचे गाळप उद्दिष्ट्य असून आपल्या प्रत्येक अडचणी सोडविल्या जातील. १५० दिवसांच्या हंगामात चांगला व्यवसाय करण्याची संधी आहे. कारखाना आराखडा देईल त्यानुसार उसतोडणीचे काम होण्यासाठी मुकादम यांची प्रमुख जबाबदारी आहे. मुकादम आणि ऊस तोडणी कामगार कारखान्याचा आत्मा असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले

सौ. विखे यांनी आगामी गळीत हंगामात ५ हजार टन बैलगाडीने व ११ हजार टन ट्रॅक्टरने ऊस पुरवठा करणाऱ्यांना मी व्यक्तिगत बक्षीस देवून सन्मानित करीन, अशी घोषणा सौ. विखे यांनी केली.

ऊस तोड विभाग प्रमुख एस. बी. चव्हाण, शेतकी विभाग प्रमुख किशोर आहेर, शेतकी अधिकारी विठ्ठल बेंद्रे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी कार्यक्रमाला उपस्थित होते.

### यावर्षी चांगला गाळप हंगाम होईल : विखे

आशिया खंडातील या पहिल्या कारखान्याचा नावलौकिक निर्माण होण्यात मुकादम आणि कामगार यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. ऊस तोडणी कामगारांच्या सोयी-सुविधांसाठी कारखाना कुठेही कमी पडणार नाही. मुलांच्या शिक्षणाची सोय आणि आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देऊ. सर्वांच्या सहकार्यामुळे संस्था वाटचाल करतात. कारखान्याचा विस्तार करण्यात आला असून चांगला गाळप हंगाम होईल, अशी अपेक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी व्यक्त केली.

# रेणुका कलाकेंद्रावर जमावाचा हल्ला

## तीन दिवसात दुसरी घटना; जामखेड पोलिसात गुन्हा दाखल



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील मोहा येथे असलेल्या रेणुका कलाकेंद्रात दि. १० रोजी रात्रीच्या बाराच्या सुमारास अज्ञात १७ जणांच्या जमावाने तोंडाला रूमाल लावून तलवार, काठ्या, कोयते घेऊन आले. त्यांनी कलाकेंद्राच्या आवारातील दुचाकी व रिक्षा यांची तोडफोड केली तसेच गेटवर असलेल्या किराणा दुकानाचे काऊंटर फोडून कलाकेंद्रात प्रवेश करून तेथील होम थिएटर व लोकांना बसण्यासाठी ठेवलेल्या ५० खुर्च्यांची तोडफोड केली.

सुमारे वीस मिनिटे असा प्रकार चालू होता. सदर घटनेची माहिती पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली तोपर्यंत सर्व अज्ञात जमाव चारचाकी वाहनातून बीडच्या दिशेने निघून गेले. तीन दिवसांपूर्वी सदर रेणुका कलाकेंद्रावर आष्टी (जि. बीड) येथील तीन व जामखेड येथील एक जणांनी धुडगूस घातला होता.

याबाबत जामखेड पोलीसात ज्योती पवार (वय ४० वर्षे धंदा कलाकेंद्र, रा. रेणुका सांस्कृतीक लोकनाटक कला केंद्र, मोहा) यांनी फिर्याद दिली की, दि. ७ रोजी रेणुका कलाकेंद्रात शुभम लोखंडे, सतीश टकले, नागेश रेडेकर सर्व (रा. आष्टी जि. बीड) व अक्षय मोरे (चिंग्या) या आरोपींनी हातातील कोयत्याने रेणुका कलाकेंद्रातील खुर्च्या, टेबल व दोन चाकी मोटार सायकल स्कुटीची तोडफोड केलेबाबत व कलाकेंद्रातील नृत्यकाम करणारे मुलींची छेडछाड केली आहे.

ज्योती पवार यांच्या फिर्यादीवरून एकुण १७ जणांनवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस नाईक रवींद्र वाघ हे करीत आहे.

# कांगोणीत खा. लंकेच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील कांगोणी येथील संत किसन महाराज सुडके प्रतिष्ठानच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराजांच्या भूमीचा गौरव म्हणून राज्यस्तरीय साहित्य पुरस्काराचे वितरण नगर दक्षिणचे खा. निलेश लंके व संत, महंतांच्या हस्ते करण्यात आले. साहित्य क्षेत्र व वारकरी संप्रदायाचा हा अगळा उपक्रम पाहण्यास आणि ऐकण्यास पंचक्रोशीतील भाविक उपस्थित होते.

पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अगोदर बाळकृष्ण महाराज सुडके यांचे काल्याचे किर्तन झाले. अध्यक्षस्थानी संत ज्ञानेश्वर महाराज पैसखांब मंदीराचे अध्यक्ष पांडुरंग अभंग होते. सुडके महाराज यांनी प्रास्ताविक भाषणात संत किसन महाराज सुडके पुण्यस्मरण सोहळा व साहित्य पुरस्कार विषयी माहिती दिली. खा. लंके व नामदेव महाराज पोकळे यांच्या हस्ते शाल, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन पत्रकार विनायक दरंदले यांचा पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास अनिल महाराज गरुड, मुंढे महाराज, राजु महाराज कातकडे, पंढरीनाथ महाराज, वखरे महाराज, माजी सभापती तुकाराम मिसाळ, राजेंद्र पाचे, सतिश थोरात आदी उपस्थित होते. ओंकार महाराज सुडके, लक्ष्मण पोंधे, योगेश रासने व संतसेवकांनी मान्यवरांचा सत्कार केला. रेवणनाथ पवार यांनी सुत्रसंचालन केले. प्राचार्य निवृत्ती मिसाळ यांनी आभार मानले.

### या साहित्यिकांना पुरस्कार केला प्रदान

साहित्यिक तुळशीराम बोबडे, वासुदेव खोपडे, नरेश पाटील, डॉ. लक्ष्मण शिवणेकर, डॉ. श्रीकांत पाटील, सूर्यकांत धर्माधिकारी, चुडाराम बल्हारपुरे, सत्यवान मंडलिक, दिनेश फडतरे, कविता मेहंदळे, गंगा गवळी, शिवाजी बागल आदींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

# अखेर अकोल्याचाही अतिवृष्टीग्रस्त यादीत समावेश

## पालकमंत्री विखे व माजी आ. वैभवराव पिचड यांच्या प्रयत्नांना यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या प्रयत्नानंतर अकोले तालुक्याचाही अतिवृष्टीग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.

अकोले तालुका वगळल्यामुळे तीव्र संताप व्यक्त होत होता. माजी आमदार वैभवराव पिचड यांनी नाशिक येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले असता त्यांची भेट घेऊन त्यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. अकोले तालुक्यात यावर्षी अनेक वेळा अतिवृष्टी झाली. जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस अकोले तालुक्यात पडला. मुळा, भंडारदरा, आढळा, धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून गेले.

मे महिन्यात सुरू झालेला पाऊस मागील आठवड्या पर्यंत पडतच होता. अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे अकोले तालुक्यातील सर्वच प्रकारच्या पिकांचे मोठ्या नुकसान झाले. शेतात साठलेल्या पाण्यामुळे अनेक ठिकाणी पिके सडली. खरीप हंगाम हातचा गेला असल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे अकोले तालुक्याचा समावेश अतिवृष्टी ग्रस्त तालुक्यांच्या यादीत होण्याची गरज असल्याची मागणी माजी आमदार वैभवराव पिचड यांनी केली.





यावेळी सीताराम भांगरे, रावसाहेब वाकचौरे हेही त्यांच्या समवेत उपस्थित होते.

जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही या बाबीस दुजोरा देत मुख्यमंत्र्यांकडे अकोले तालुक्यावर झालेला अन्याय दूर करण्याची मागणी केली. त्यानुसार फडणवीस यांनी प्रशासनाला याबाबत उचित कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

### आदेश निघाल्याने शेतकऱ्यांत समाधान

मुख्यमंत्र्यांनीही त्यांच्या मागणीची दखल घेत तत्काळ त्यावर कार्यवाही करण्याचे आदेश प्रशासनाला दिले व त्याप्रमाणे आजच शासनाने अतिवृष्टी ग्रस्तांच्या यादीत समावेश करण्याचा आदेश काढण्यात आला. त्यामुळे आधी संताप व्यक्त करणाऱ्या कार्यकर्त व शेतकऱ्यांनी आदेश निघाल्या बद्दल समाधान व्यक्त केले आहे.

# आयटीआयमध्ये अल्पकालीन कोर्सचे उद्घाटन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** देशभरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी ऐतिहासिक ठरलेला दि. ८ ऑक्टोबरचा दिवस होता. महाराष्ट्रातील तब्बल ४१९ शासकीय आयटीआय संस्थांमध्ये अल्पकालीन कोर्सेसचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण तसेच शहरी भागातील युवकांना तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

आयटीआय जामखेड येथेही भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विवेक कुलकर्णी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून जामखेड पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, आयएमसी सदस्य प्रवीण उगले, विश्वकर्मा अंतरा शिंदे, अनुष्का वारे, संस्थेचे प्राचार्य ए. के. वाघ, गटनिदेशक जी. बी. जाधव, के. डी. गायकवाड, सुद्रिक आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाला संस्थेतील सर्व गटनिदेशक, शिल्पनिदेशक, चतुर्थ श्रेणी कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूण ५१२ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे यश संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या एकजुटीमुळे शक्य झाले. सुत्रसंचालन सुद्रिक यांनी आभार के. डी. गायकवाड मानले.

आजच्या स्पर्धेच्या युगात युवकांनी आधुनिक तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवणे अत्यावश्यक आहे. अशा प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे युवकांना रोजगाराच्या नव्या दारांची ओळख होईल आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक भक्कम पाऊल उचलले जाईल.

– विवेक कुलकर्णी

# घरफोडी करणारा भाडेकरूच निघाला चोरटा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** येथील विखे त्यांच्या घरातील साठ हजार किमतीचे सोन्याचे दागिने चोरणारा भाडेकरू आरोपी लोणी पोलिसांनी जेरबंद केला आहे.

कान्होबा चारी पाथरे रोड येथील रहिवासी रमेश जगन्नाथ विखे यांच्या घराचे कुलूप डुप्लिकेट चावीने उघडून त्यांच्या घरातील साठ हजार किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची फिर्याद रमेश विखे यांनी लोणी पोलीस ठाण्यात दिली होती. सदर घटनेचा लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर घटनेचा तपास लोणी पोलीस करत असताना त्यांच्या असे निदर्शनात आले की, फिर्यादी यांच्या घराशेजारील राहणारा भाडेकरू अक्षय सुरेश गायकवाड (रा. शिर्डी) याने फिर्यादीच्या राहते घराच्या कुलपाची चावी डुप्लिकेट बनवून फिर्यादी यांच्या घरातील साठ किमतीचे सोन्याचे दागिने चोरल्याचे निष्पन्न झाले.

सदर आरोपीला पोलीस ही खाक्या दाखवताच त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीकडून सुमारे ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर आरोपीवर यापूर्वी लोणी पोलीस स्टेशनला ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आसल्याची माहिती मिळाली आहे.सदर घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास वाघ, पोलीस उपनिरीक्षक आशिष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल सोमनाथ गाडेकर, अमोल जाधव, निलेश सातपुते यांनी केला.

# ट्रॅक्टर्सचलीत अवजारांच्या तंत्रज्ञानात क्रांती : डॉ. नलावडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** शेतीमध्ये यांत्रिकीकरण गरजेचे झाले आहे. शेतीक्षेत्रात ट्रॅक्टर्सचे महत्व वाढले आहे. त्याचबरोबर ट्रॅक्टर्सचलीत अवजारांच्या तंत्रज्ञानात मोठी क्रांती घडत आहे. शेतीमधील महत्वाच्या कामांकरीता लागणाऱ्या अवजारांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारीत तंत्रज्ञानाचा वापर होत असून यासाठी आपलेही सर्वोत्कृष्ठ योगदान द्या, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी केले.




महात्मा फुले कृषि विद्यापीठात डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि महाविद्यालयामध्ये दीक्षारंभ-२०२५ आणि अभिजात मराठी भाषा सप्ताह या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन डॉ. सचिन नलावडे बोलत होते. याप्रसंगी व्याख्याते म्हणुन दया भोर व इंजि. महेश इथापे उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर मालेगाव, काष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, अक्षय उर्जा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. विरेंद्र बारई, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गडगे व कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव वैभव बारटक्के उपस्थित होते.

# बैलगाडा शर्यतीला मिळाली परवानगी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील बैलगाडा रसिक बांधवांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण जिव्हाळ्याच्या असलेल्या बैलगाडा शर्यतीच्या आयोजनासाठी सर्व अटी व नियम यांच्या अधीन राहून बैलगाडा शर्यतीला परवानगी मिळाली आहे. त्यामुळे गाडा मालकांमध्ये आनंदाचे वातावरण असून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुजित झावरे यांच्या अथक प्रयत्नांना यश आले आहे. बैलगाडा शर्यतीच्या परवानगीला जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय ही प्रक्रिया पूर्ण होत नाही व शर्यत आयोजनात अडथळे तयार होवून प्रसंगी बैलगाडा शर्यत रद्द होण्याची नामुष्की तयार होते.

सदर प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी संबंधित शर्यतीच्या परवानगीबाबतचे अधिकार तालुकास्तरावर प्रांताधिकारी यांना देणेबाबत मागणी सुजित झावरे यांनी केली होती. बैलगाडा शर्यतीला परवानगी मुळे आता बैलगाडा चालक-मालक संघटनेचा मोठा किचकट कागदांचा प्रवास हा सुकर होणार आहे. परवानगीसाठी आता तालुकास्तरावर अधिकार प्राप्त झाल्याने पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर, निघोज, जवळा, पिंपळगाव रोठा, विरोली, कान्हूर पठार, अळकुटी, पोखरी, काटाळवेढा,नांदूर पठार व तालुक्यातील बैलगाडा मालकांना मोठा दिलासा मिळाला असून बैलगाडा रसिक बांधवांनी आनंद व्यक्त केला.

# ‘कोपरगाव दिवाळी हाट’मुळे दिवाळीची खरेदी सोपी

## पुष्पाताई काळे; कोपरगाव शहरात कोपरगाव दिवाळी हाटचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव दिवाळी हाटच्या माध्यमातून कोपरगावकरांना एकाच ठिकाणी दिवाळी सणाची सर्व प्रकारची खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. पारंपरिक दिवे, पूजेचे साहित्य, फराळाचे तयार पदार्थ, हाताने तयार केलेल्या सजावटीच्या वस्तू, तयार कपडे अशा अनेक उपयुक्त वस्तू येथे माफक दरात मिळत आहेत. त्यामुळे दिवाळीच्या सणाला खरेदीसाठी नागरीकांच्या चिंता दूर होवून ग्राहकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचण्यास मदत होत असून कोपरगाव दिवाळी हाटमुळे कोपरगावकरांची दिवाळी सणाची खरेदी सोपी झाली असल्याचे प्रतिपादन गौतम बँकेच्या माजी संचालिका व प्रियदर्शिनी महिला मंडळाच्या अध्यक्षा पुष्पाताई काळे यांनी केले.

प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळ व आ. आशुतोष काळे यांच्या वतीने कोपरगाव शहरातील कृष्णाई मंगल कार्यालयात दरवर्षी प्रमाणे शुक्रवार (दि.१०) पासून तीन दिवस कोपरगाव दिवाळी हाटचे आयोजन करण्यात आले आहे. या कोपरगाव दिवाळी हाटचे उदघाटन पुष्पाताई काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी त्या बोलत होत्या.

सौ. काळे म्हणाल्या की, प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळा मार्फत वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून मागील काही वर्षापासून नागरिकांना दिवाळीची खरेदी करणे सोयीस्करपणे करता यावी या उद्देशातून दिवाळीच्या खरेदीसाठी कोपरगाव दिवाळी हाट हा खरेदी महोत्सव सुरु करण्यात आला. बचत गटाच्या स्थानिक महिलांना, उद्योजकांना आणि व्यावसायिकांना त्याचा उत्पादित माल विक्रीसाठी व्यासपीठ मिळावे व कोपरगावकरांना दिवाळीची खरेदी करतांना त्रास होवू नये या दुहेरी उद्देशातून कोपरगाव दिवाळी हाट सुरु केला.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या सदस्या, बचत गटाच्या महिला भगिनी व नागरिक उपस्थित होते.



उच्च दर्जाचे साहित्य माफक दरात मिळत असल्यामुळे नागरीकांचा देखील दरवर्षी अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळत असून त्यामुळे दरवर्षी आर्थिक उलाढाल वाढत चालली आहे. याहीवर्षी तीन दिवस चालणाऱ्या या कोपरगाव दिवाळी हाटमध्ये खरेदी करून आपला दिवाळीचा आनंद द्विगुणीत करावा.

– पुष्पाताई काळे

# शेतकऱ्यांच्या खात्यांवरील होल्ड/लीन मुक्त करा

## बेलापूर हरिहर फाउंडेशनची तहसीलदारांकडे मागणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर :** शेतकऱ्यांच्या खात्यांवरील होल्ड/लीन त्वरित मुक्त करावे, अशी मागणी बेलापूर हरिहर फाउंडेशननी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सविस्तर असे की, दुष्काळ आणि पीक नुकसानामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर आहे. अनेक शेतकऱ्यांच्या खात्यांवर कर्ज खाते व्याज न भरल्यामुळे होल्ड किंवा लिंक ठेवण्यात आले आहे. ज्यामुळे शासनाकडून येणारी दुष्काळ सहाय्यता आणि पीकविमा रक्कम प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक आणि मानसिक संकटाचा सामना करावा लागत आहे, तर बँकांमध्ये व्याज वेळेवर न भरल्यामुळे त्यांना अनेकदा अपमानास्पद वागणूक मिळते.

या कठीण परिस्थितीत श्री हरिहर फाउंडेशनने तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांच्या खात्यांवरील होल्ड/लीन त्वरित मुक्त करावेत, जेणेकरून शासनाकडून येणारी मदत रक्कम शेतकऱ्यांपर्यंत अडथळ्याशिवाय पोहोचू शकेल आणि आर्थिक संकटात शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असे निवेदनात हरिहर फाउंडेशनच्या वतीने मागणी करण्यात आली. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम नाईक व सहकारी भगवानराव सोनवणे, विजयराव कुऱ्हे, विजयराव शेलार, मधुकर ठोंबरे, सुरेश जाधव, अमन सय्यद, ओम कुमावत, रवींद्र अमोलिक, इमाम पठाण, सचिन पवार उपस्थित होते. फाउंडेशनच्या या प्रयत्नामुळे शेतकऱ्यांना प्रशासनाकडून तात्काळ मदत मिळेल, अशी आशा व्यक्त केली.




बाळासाहेब ठाकरेंचा नातू ऐश्वर्य ठाकरे याच्याबरोबर 'निशानची' या चित्रपटात वेदिका पिंटो ही भारतीय मॉडेल, नृत्यांगना आणि अभिनेत्री झळकणार आहे. ऋत्विज यांच्या 'लिग्गी' या म्युझिक व्हिडिओमुळे ती प्रसिद्ध झाली. त्यात तिने एका धाडसी, मोकळी आणि निर्भय नवरीची भूमिका साकारली. सलमान खानने हा व्हिडिओ आपल्या इंस्टाग्रामवर शेअर करून आजच्या पिढीची उर्जा आणि आत्म विश्वासाचे कौतुक केल्यामुळे वेदिका विशेष चर्चेत आली. वेदिकाने २०१९ मध्ये 'लीजेंडरी' या म्युझिक व्हिडिओमधून पहिल्यांदा प्रेक्षकांचे लक्ष वेधले. मोहक व्यक्तिमत्त्व आणि नैसर्गिक अभिनयशैलीमुळे ती लवकरच चर्चेत आली. आदित्य रॉयकपूरसोबतचा 'ऑपरेशन रोमिओ' हा तिचा पहिला चित्रपट होता. ती धर्मा प्रॉडक्शनच्या 'बॉम्बे गर्ल' या प्रोजेक्टशी जोडली गेल्याने तिला अनेक चाहते आणि फोलोअर्स मिळाले.

## मोहक वेदिका पिंटो

सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या वेदिकाची फॅशन सेन्स आणि फोटोज नेहमीच चर्चेत असतात. ती मुंबईत वाढली असून शिक्षणानंतर अभिनय क्षेत्राकडे वळली. तिचा चित्रपटसृष्टीतील प्रवास सुरुवातीच्या टप्प्यात असला तरी ती लवकरच यशस्वी होणार याबाबत तिच्या चाहत्यांना खात्री आहे.





## जिंदा हू मै!

काही दिवसपूर्वी 'सिंघम'फेम अभिनेत्री काजल अग्रवालचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची वावटळ उठली होती. एका अपघातात काजल गंभीर जखमी झाली आणि तिचा मृत्यू झाला, अशी चर्चा सोशल मीडियावर ऐकायला मिळाली. पण ही बातमी व्हायरल झाल्यानंतर अभिनेत्रीने स्वतः पुढे येऊन या अफवांचे खंडन केले. काजल अग्रवाल नुकतीच पती गौतम किचलूसोबत मालदीवमध्ये सुट्टीवर गेली होती. तिने इन्स्टाग्रामवर सुट्टीतील फोटो शेअर केले आणि सांगितले, की मी पूर्णपणे ठीक आहे, सुरक्षित आहे. खूप चांगलं काम करते आहे. मी तुम्हाला विनंती करते की अशा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नका किंवा त्या व्हायरल करू नका.

## रश्मिकाचा साखरपुडा?

अभिनेत्री रश्मिका मंदाना अलिकडेच साउथ इंडियन इंटरनॅशनल मूव्ही अवॉर्ड्स २०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी दुबईमध्ये गेली. दुबई विमानतळावर तिच्या अनामिकेतील हिऱ्याच्या अंगठीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अभिनेत्रीची अंगठी पाहून सोशल मीडिया वापरकर्त्यांनी अंदाज लावला की रश्मिका आणि दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडा यांनी गुपचूप साखरपुडा केला आहे. एका व्हिडिओमध्ये रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा न्यूयॉर्कमधील मॅनहॅटनच्या रस्त्यावर हातात हात घालून चालताना दिसत होते. तथापि, कॅमेरे पाहताच दोघांनी लगेच हात सोडले आणि हसून चाहत्यांकडे बघून हात हलवू लागले.



## गुपित उघड...

२००७ मध्ये आलेल्या 'आवारापन' या लोकप्रिय चित्रपटाचा सिक्वल लवकरच येणार आहे. विशेष म्हणजे या चित्रपटात इम्रान हाश्मी बरोबर रोमान्स करणाऱ्या अभिनेत्रीच्या नावाबद्दल गुप्तता पाळली जात होती. परंतु ३ एप्रिल २०२६ ला थिएटरमध्ये रिलीज होणाऱ्या या बहुप्रतीक्षित चित्रपटात दिशा पटनी दिसणार हे आता उघड झालं आहे. विक्रम भट्ट यांच्या या चित्रपटात दिशा पटनीला मुख्य अभिनेत्री म्हणून कास्ट केलं गेलं आहे. त्यामुळे 'आवारापन २' या सिनेमाबद्दल लोकांची उत्सुकता वाढली आहे.



## 'निशानची'मधून ऐश्वर्य ठाकरेचे बॉलीवूडमध्ये पदार्पण

ऐश्वर्य ठाकरेचा 'निशानची', अक्षयकुमारचा जॉली एलएलबी ३ आणि अजय : द अनटोल्ड स्टोरी ऑफ अ योगी हे तीन चित्रपट सध्या चर्चेत आहेत. ॲमेझॉन एमजीएम स्टुडिओज इंडिया निर्मित अनुराग कश्यप दिग्दर्शित निशानची हा मनोरंजनपट ॲक्शन, ड्रामा, रोमान्स, कॉमेडी असा फिल्मी मसाला असलेला नवा चित्रपट आहे. बाळासाहेब ठाकरे यांचा नातू ऐश्वर्य ठाकरे या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करत आहे. 'निशानची' मध्ये ऐश्वर्यने बबलू आणि डबलू या जुळ्या भावांची दुहेरी भूमिका साकारली आहे. त्याच्यासोबत वेदिका पिंटो, मोनिका पवार, मोहम्मद जीशान अय्यूब, कुमुद मिश्रा हे कलाकार या चित्रपटात आहेत. प्रसून मिश्रा, रंजन चंदेल आणि अनुराग कश्यप यांनी या सिनेमाची कथा लिहिली आहे.



गेल्या काही महिन्यांपासून 'जॉली एलएलबी'च्या सीक्वलची चर्चा सुरु होती. या चित्रपटात अक्षयकुमार जॉली मिश्राच्या भूमिकेत आहे तर अर्शद वारसी जॉली त्यागीच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात विनोद, ड्रामा आणि भावनांचा तडका असेल. ही एक कोर्टरूम कॉमेडी असून जॉली मिश्रा आणि जॉली त्यागी यांच्यातील मजेशीर युक्तिवाद पहायला मिळतील. या चित्रपटात हुमा कुरेशी, अमृता राव आणि गजराज राव यांच्याही भूमिका आहेत.

'अजय : द अनटोल्ड स्टोरी ऑफ अ योगी' हा योगी आदित्यनाथ अर्थात अजयसिंह बिष्ट यांच्या जीवनावर आधारित चरित्रपटदेखील प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. हिमालयातील एका छोट्या गावातून सुरुवात करून संन्यासी, आध्यात्मिक नेता आणि पुढे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री होईपर्यंतचा त्यांचा प्रवास यात दाखवला आहे. या चित्रपटात अनंत विजय जोशी यांनी अजयची भूमिका साकारली आहे. परेश रावल यांनी महंत अवैद्यनाथ यांची भूमिका केली असून त्यांनी अजयच्या प्रवासाला दिशा दिली. हा चित्रपट शंतनू गुप्ता लिखित बेस्टसेलिंग पुस्तकावर आधारित असून राजकारण आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवतो.

## आतली बातमी फुटली...

वीजी फिल्म्स या बॅनरअंतर्गत दिग्दर्शक विशाल पी. गांधी आणि जैनेश इजरदार मराठी प्रेक्षकांसाठी 'आतली बातमी फुटली' हा चित्रपट घेऊन आले आहेत. एका खूनाच्या सुपारीच्या रहस्यभेदाभोवती या सिनेमाची कथा फिरते. जोडीदाराच्या खुनाची सुपारी देण्याची वेळ आलेल्या एका नवऱ्याची आणि सुपारी घेणाऱ्या व्यक्तीची उडणारी त्रेधातिरपीट दाखवणारा 'आतली बातमी फुटली' हा चित्रपट म्हणजे उडणारा गोंधळ आणि अनपेक्षित घटनांची धमाल आहे. ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे, ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, पॉवरपॅक्ड अभिनेता सिद्धार्थ जाधव असे मराठीतले नामवंत चेहरे या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र आले आहेत. हा कॉमेडी थ्रिलर चित्रपट १९



सप्टेंबरला राज्यभरात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. खिळवून ठेवणारी कथा असलेला 'आतली बातमी फुटली' प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची ट्रीट ठरणार आहे. धक्कादायक वळण घेणारा हा चित्रपट प्रत्येकाला 'सरप्राईज' करेल असा विश्वास दिग्दर्शक विशाल गांधी यांनी व्यक्त केला.

## अनुपर्णा रॉय यांचा सन्मान

२०२५ चा व्हेनिस चित्रपट महोत्सव २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान इटली इथे पार पडला. त्यात चित्रपट निर्मात्या अनुपर्णा रॉय यांना 'सॉंग्स ऑफ फरगॉटन ट्रीज' या त्यांच्या पहिल्याच चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. संपूर्ण देशासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला. 'सॉंग्स ऑफ फरगॉटन ट्रीज' या चित्रपटासाठी त्यांना ओरिझोन्टी विभागाचा सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार देण्यात आला. समारोप समारंभात ओरिझोन्टी ज्युरीच्या अध्यक्षा, फ्रेंच चित्रपट निर्मात्या ज्युलिया डुकोर्नो यांनी या पुरस्काराची घोषणा केली. ही कामगिरी भारतीय चित्रपटसृष्टीसाठी एक महत्त्वाचा टप्पा मानली जाते आहे. हा चित्रपट अनुराग कश्यप यांनी सादर केला होता. महोत्सवाच्या ओरिझोन्टी स्पर्धा विभागात त्याचा प्रीमियर झाला. पुरस्काराबाबत अनुपर्णा म्हणाल्या, 'जिला नेहमीच दुर्लक्षित केले गेले किंवा कमी लेखले गेले अशा प्रत्येक महिलेला हा चित्रपट समर्पित आहे. मला आशा आहे की, या विजयामुळे महिलांचा अधिक आवाज आणि शक्ती जगाच्या समोर येईल.' चित्रपटाची कथा थोया नावाच्या एका सुंदर आणि बुद्धिमान स्थलांतरित मुलीची आहे. तिला अभिनेत्री व्हायचे आहे आणि तिची धडपड यात मांडली आहे. इटलीच्या व्हेनिस येथे पांढऱ्या साडीत पुरस्कार स्वीकारण्यासाठी आलेल्या अनुपर्णा रॉय यांनी या सन्मानाचे वर्णन 'स्वप्न साकार होण्याचा क्षण' असे केले आहे.



## एआय विरुद्ध ऐश्वर्या!

ऐश्वर्या राय बच्चन ग्लॅमर, अभिनय आणि व्यक्तिमत्त्वासाठी नेहमीच चर्चेत असते. बराच काळ मोठ्या पडद्यापासून दूर राहूनही ऐश्वर्याची लोकप्रियता तशीच आहे. नुकतीच स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी तिने दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. एआयद्वारे अश्लील आणि बनावट सामग्री तयार करून आपले फोटो आणि नाव वापरले जात असल्याचा तिने आरोप केला. या फोटोंचा वापर कॉफी मग, टी-शर्ट आणि इतर वस्तू विकण्यासाठी केला जात आहे. ऐश्वर्याच्या वकिलांनी सांगितले की इंटरनेटवर फिरणाऱ्या या प्रतिमा पूर्णपणे एआय जनरेटेड आहेत आणि कोणत्याही वास्तवाशी जुळत नाहीत. परंतु तरीही तिचे नाव आणि चेहरा जोडून पैसे कमावले जात आहेत. तिचे नाव आणि चेहरा वापरण्याचा अधिकार कोणालाही नाही. न्यायालयाने या प्रकरणी पुढील सुनावणी ७ नोव्हेंबर रोजी संयुक्त रजिस्ट्रारसमोर आणि १५ जानेवारी २०२६ रोजी उच्च न्यायालयात ठेवली आहे. या बॉलिवूड सुपरस्टारला नेहमीच आपले कुटुंब आणि वैयक्तिक जीवन गोपनीय ठेवायचे असते. परंतु इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या साम्राज्यात तिच्या नावाचा आणि प्रतिमेचा गैरवापर सतत वाढतो आहे. ही याचिका दाखल करून ऐश्वर्याने स्पष्ट संदेश दिला आहे की आपल्या प्रतिमेचा आणि व्यक्तिमत्त्वाचा कोणताही बेकायदेशीर वापर सहन केला जाणार नाही. हे प्रकरण केवळ बॉलिवूड सेलिब्रिटीसाठीच नाही तर संपूर्ण डिजिटल आणि सोशल मीडियावर सेलिब्रिटी हक्कांच्या संरक्षणासाठी एक महत्त्वाचे उदाहरण ठरेल अशी चिन्हे दिसत आहेत. तिच्यापाठोपाठ अभिषेक बच्चननेही याच कारणासाठी कोर्टात धाव घेतली आहे.



## 'द बॅड्स ऑफ बॉलीवूड' आणि 'द ट्रायल सीझन २'

शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याची 'द बॅड्स ऑफ बॉलीवूड' ही वेब सिरीज १८ सप्टेंबर २०२५ पासून नेटफ्लिक्सवर दाखवली जाणार आहे. या वेब सिरीजद्वारे आर्यन खान लेखक-दिग्दर्शक म्हणून पदार्पण करत आहे. ही सिरीज बॉलिवूडच्या ग्लॅमरस दुनियेमागील खरे आणि काहीसे विचित्र जग प्रेक्षकांसमोर आणणार आहे. बाहेरून चकाचक दिसणाऱ्या या दुनियेच्या आत यशस्वी होण्यासाठी काय काय करावे लागते आणि प्रसिद्धीच्या झगमगाटामागे दडलेले वास्तव काय आहे ते या सिरीजमध्ये धाडसीपणे दाखवण्यात येणार आहे. या सिरीजमध्ये लक्ष्य लालवानी मुख्य भूमिकेत आहे. त्यात बॉबी देओल, मोना सिंग, मनोज पाहवा यांसारखे दमदार कलाकार आहेत. विशेष म्हणजे शाहरुख खान, सलमान खान, रणवीर सिंग आणि करण जोहर यांच्यासारखे अनेक मोठे कलाकारही त्यात आहेत. 'द बॅड्स ऑफ बॉलीवूड' या मालिकेतून आर्यन खान प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यात यशस्वी ठरेल, अशी आशा आहे. दरम्यान, काजोलच्या 'द ट्रायल-प्यार, कानून, धोका' या सीरिजच्या पहिल्या भागाला प्रेक्षकांनी खूप प्रेम दिल्यानंतर आता सीरिजचा दुसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सीरिजच्या पहिल्या सीझनची कथा काजोलने साकारलेल्या वकील नयोनिका हिच्याभोवती फिरणारी होती. 'द ट्रायल' चा दुसरा सीझन १९ सप्टेंबर २०२५ ला जिओ हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होणार आहे. या सीझनमध्ये काजोल पुन्हा एकदा वकील नोयोनिका सेनगुप्ताच्या प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. आता या नव्या सीझनमध्येही कोर्टरूम ड्रामा आणि भावनिक गुंतागुंत यांचे मिश्रण पहायला मिळणार आहे. 'द ट्रायल'ची संपूर्ण कथा रॉबर्ट किंग आणि मिशेल किंग यांच्या 'द गुड वाईफ' या प्रसिद्ध अमेरिकन शोवरून प्रेरित आहे.



दैनिक

# जनता आवाज

अहमदनगर, रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५ पान नं.८


## गुंगीचे औषध देवून महिलेवर अत्याचार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** चॉकलेटमध्ये गुंगीचे औषध देऊन ३३ वर्षीय महिला डॉक्टरवर अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. हा प्रकार मार्च ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान घडला असून याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इरफान शेख (पूर्ण नाव माहित नाही) रा. बंगाल चौकी, माळीवाडा, अहिल्यानगर असे गुन्हा दाखल झालेल्या इसमाचे नाव आहे. आरोपी हा महिला



डॉक्टरला वेळावेळी दवाखान्यात बोलावून घेत असे. दवाखान्यात असताना आरोपीने गुंगी येणारे औषध देऊन महिलेवर वेळोवेळी अत्याचार केला. तसेच त्यांच्यासोबत अश्लील फोटो व व्हीडिओही काढले. या फोटोचा वापर त्याने महिलेला धमकी देण्यासाठी केला. माझ्यासोबत लग्न कर नाहीतर अश्लील फोटो तुझ्या नातेवाइकांना दाखवून तुझी बदनामी करीन, अशी धमकी दिली.

लग्नास नकार दिल्याने आरोपीने महिलेला जिवे मारण्याची धमकी दिली. महिलेने तोफखाना पोलिस ठाण्यात येऊन आरोपीविरोधात फिर्याद दिली. त्यावरून अत्याचाराचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक पी. बी. दळवी करत आहेत.

## मंदिरामध्ये चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

### १५ गुन्हे उघडकीस; ४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** जिल्ह्यातील विविध मंदिरांमध्ये चोरी करणाऱ्या टोळीला गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गजाआड केले आहे. या आरोपींकडून १५ गुन्हे उघडकीस आले असून त्यांच्याकडून ४ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आले आहे.

राहुल किशोर भालेराव (रा. वडाळा महादेव, ता. श्रीरामपूर), रामेश्वर ज्ञानदेव धनेश्वर (रा. इंदिरानगर, भोकर ता. श्रीरामपूर), एकनाथ नारायण माळी (रा.



ममदापूर ता. राहाता), शत्रुघ्न मुरलीधर मोरे (रा. टाकळी मानुर, ता. पाथर्डी) यांना अटक केली आहे. तसेच राहुल भाऊसाहेब माळी (रा. बिरोबा बन, शिर्डी, ता. राहाता, दत्तु बाबासाहेब मोरे (रा. भोकर, ता. श्रीरामपूर) असे पसार आरोपींची नावे आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये मंदीरातील दानपेटी, देवी, देवतांचे दागिने चोरीच्या घटनांमध्ये वाढ झालेली होती. मंदीरामध्ये झालेल्या चोरीच्या घटनांमुळे भाविक व ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण तयार झालेले होते. पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदीरामध्ये झालेल्या घरफोडी चोरीच्या घटनांचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत आदेश दिलेले होते. यानंतर आरोपींना गजाआड केले.

## ओढा अतिक्रमण विळख्यात विद्यार्थ्यांचे हाल

### ओढा, पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करण्याबाबतचे ग्रामस्थांचे आ. खताळांना साकडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील करुले शिवारातील ओढा अतिक्रमणाच्या विळख्यात सापडला असून ओढा नाममात्र शिल्लक राहिला आहे. या बेकायदेशीर अतिक्रमणा मुळे शेतकऱ्यांना तसेच वाड्या-वस्त्यांवर राहणाऱ्या ग्रामस्थांना शेतात जाण्यासाठीचा पाणंद रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आणि शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल होत आहे. हा ओढा अतिक्रमण मुक्त करावा, असे साकडे करुले




ग्रामस्थांनी आमदार अमोल खताळ यांची भेट घेऊन घातले आहे.

संगमनेर तालुक्यातील करूले येथील पाझर तलाव ते निळवंडे, या दरम्यानच्या ओढ्याच्या दोन्ही बाजूंनी काही शेतकऱ्यांनी बेकायदेशीररीत्या शेततळे, विहिरी तसेच सिमेंट काँक्रीटची बांधकामे केली आहेत त्यामुळे ओढा केवळ कागदावरच उरला आहे. या ओढ्याचा उपयोग पाणी वाहून नेण्यासाठी तसेच पाणंद रस्त्यासाठी केला जात असल्याने दोन्ही बाजूंनी शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

काही व्यक्तींनी ओढ्यात दगड, लाकूड व लोखंडी सळ्या टाकून रस्ता बंद केला होता . या प्रकारामुळे अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती.

या घटनेची माहिती मिळताच तहसीलदारांनी निळवंडेचे कामगार तलाठी यांना रीतसर पंचनामा करण्याचे आदेश दिले. यावेळी बाळासाहेब आहेर, शिवाजी आहेर, राजेंद्र आहेर, आरिफ पठाण व ग्रामस्थ उपस्थित होते.

#### अधिकाऱ्यांना दिले चौकशीचे आदेश

ग्रामस्थांनी अतिक्रमणाचा मुद्दा आ अमोल खताळ यांना निवेदन देत थोडा अतिक्रमण मुक्त करण्याची मागणी केली आहे. यावेळी तात्काळ महसूलच्या अधिकाऱ्यांना चौकशी करण्याचे निर्देश देऊन करुले शिवारातील ओढा व पाणंद रस्ता नियमाप्रमाणे अतिक्रमणमुक्त केला जाईल. तसेच या प्रकरणात अडथळा निर्माण करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे ग्रामस्थांना सांगितले.

## संघटनेचा पाया पुन्हा मजबूत करणार

### माजी आ. लहू कानडे; यशोधन कार्यालयात बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुका डोळ्यासमोर ठेवत माजी आमदार लहू कानडे यांनी आपली राजकीय पायाभरणी पुन्हा एकदा हालचालीत आणली आहे. ''स्थानिकांना ताकद देणार, संघटनेचा पाया पुन्हा मजबूत करणार,'' असा थेट संदेश देत त्यांनी कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्याची तयारी सुरू केली आहे.

यशोधन संपर्क कार्यालयात



शुक्रवारी झालेल्या बैठकीत कानडे बोलत होते. या वेळी राजेंद्र कोकणे, सचिन जगताप, कार्लस साठे, बापूसाहेब लबडे, स्वप्निल जाधव, जमीर पिंजारी, भैय्या शाह, रुबिना पठाण, सतीश बोर्डे, दीपक निंबाळकर, नानासाहेब रेवाळे, रमेश आव्हाड, हरिभाऊ बनसोडे, राधाकृष्ण तांबे, अण्णासाहेब ढोणे, चांगदेव देवराय, प्रतीक कांबळे, आशिष शिंदे, विनोद थोरात, अक्षय वाणी आदी उपस्थित होते.

साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते मिळालेल्या पुरस्कारानिमित्त कानडेंचा सत्कार करण्यात आला. बैठकीस माजी नगरसेवक राजेश अलघ, मुक्तार शाह, बाबासाहेब खोसरे, भाऊसाहेब मुळे, नीलेश भालेराव हेही उपस्थित होते. पालिका निवडणुकीबाबतही प्राथमिक चर्चा झाल्याचे समजते.

#### निवडणुका महायुतीच्या बळावर लढवाव्यात

दरम्यान, पंचायत समितीच्या सभापती पदाचे आरक्षण काढण्यात आले असून, १३ ऑक्टोबरला तालुक्यातील आठ गणांची सोडत होणार आहे. त्यानंतर जिल्हा परिषद निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर होणार आहे. ''दोन्ही निवडणुका महायुतीच्या बळावर आणि जोरदार ताकदीने लढवाव्यात,'' अशी मागणी राजेंद्र कोकणे यांनी केली. त्यावर कानडेंनी उपस्थितांना रणनीतीसंदर्भात मार्गदर्शन केले.

## 'सीएसआरडी'कडून आपत्तीग्रस्तांना मदत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गोरगरीब कुटुंबाचे मोठे नुकसान झाले अनेकांच्या घरात पाणी घुसल्याने धान्य भिजले संसार उपयोगी वस्तू नदीच्या पुराच्या प्रवाहात वाहून गेल्या. त्यामुळे हातावर पोट असणाऱ्या अनेक गरीब गरजू कुटुंबाचे या अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले. अशा नुकसानग्रस्त कुटुंबांना सीएसआरडी कॉलेज अहिल्यानगर यांच्याकडून मदतीचा हात देण्यात आला आहे.

तिसगाव शहरातील पूरग्रस्त




कुटुंबियांना शिधा वाटपा प्रसंगी हाजी रफिक शेख, मौलाना मन्सूरभाई पठाण, पीआरपी तालुकाध्यक्ष प्रदीप ससाने, युवानेते अंबादास शिंदे, डीपीआयचे शहराध्यक्ष सुनील उमाप, सचिन खंडागळे, महेश विधाते, राजू शेख, साहिल खान यांच्यासह माता भगिनी ग्रामस्थ उपस्थित होते.

याप्रसंगी मदत घेऊन आलेल्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा मौलाना मन्सूरभाई पठाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तिसगावच्या पूरग्रस्तांना मदतीचा हात दिल्याबद्दल प्रदीप ससाने यांनी मदत देणाऱ्या संस्थेचे यावेळी आभार व्यक्त केले.

## ..तर भंडारदरा धरणाचे चाक बंद करू!

### 'भाकप'चे शेंडी येथे सत्याग्रह आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** भंडारदरा परिसरातील आदिवासी बांधवांच्या दीर्घकाळ प्रलंबित समस्यांच्या निराकरणासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा संघर्ष सुरू असून शासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास भंडारदरा धरणाचे चाक बंद करण्यात येईल, असा इशारा भारतीय कम्युनिस्ट पक्षाने शेंडी येथे आयोजित बैठ्या सत्याग्रहात दिला.

भंडारदरा धरण परिसरातील आदिवासी बांधवांच्या विविध मागण्यांसाठी शेंडी चौकात बेमुदत सत्याग्रह आंदोलन सुरू करण्यात



आले. या आंदोलनात आदिवासी बांधवांच्या समस्या मांडताना त्यांच्या वर्ग दोनच्या जमिनींना वर्ग एकचा दर्जा द्यावा, रतनवाडी, चिचोंडी आणि आंबेवंगण येथील जलजीवन योजना तातडीने सुरू करून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा, भंडारदरा धरणाचे पाणी आदिवासी बांधवांच्या शेतीसाठी उपलब्ध करून द्यावे, तसेच उच्चस्तरीय कालव्याद्वारे पाणी शेतीपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वेक्षण करण्यात यावे, भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात बुडीत बंधारे बांधण्यात यावेत आणि धरणग्रस्तांना धरणग्रस्तांचे दाखले देण्यात यावेत, अशा २९ मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने शेतकरी नेते डॉ. अजित नवले यांनी मांडले.

शेंडी येथील प्रमुख चौकात डॉ. अजित नवले यांच्या मार्गदर्शनाखाली कॉ. सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, एकनाथ मेंगाळ, राजाराम गंभिरे, सुनिल बांडे, दत्ता कोंडार, कुसा मधे, सोमा मधे, नमाजी गांगड, नवसु मधे, गणपत मधे, दशरथ झडे, भरत झडे, भाऊ उघडे, रामा उघडे, बाळा उघडे, आनंदा सगभोर, चंद्रकांत पदमेरे आणि पांडुरंग गीरे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी या सत्याग्रहात भाग घेतला.

## १७ कुटुंबांचा काळे गटात प्रवेश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील लौकी येथील कोल्हे गटाच्या १७ कुटुंबांनी एकाच वेळी आ.आशुतोष काळे यांच्या उपस्थितीत काळे गटात अर्थात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. येवू घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोल्हे गटाला मोठे भगदाड पडले असून आ.आशुतोष काळे यांचे पारडे कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागात अधिकच जड झाले आहे.

ज्या रस्त्यासाठी आम्ही त्यांच्याकडे गेलो जो आजपर्यंत कधीच झाला नव्हता. त्यावेळी त्यांनी आम्ही विरोधी गटाचे आहोत हे नाही पाहिले पण आम्ही मतदारसंघातील आहोत आणि आम्हाला रस्त्याची अडचण आहे, हे पाहिले आणि रस्त्याबाबत जेवढी अपेक्षा घेवून गेलो होतो. त्यापेक्षा जास्त चांगला रस्ता करून मिळाला असल्याचे प्रवेश करणाऱ्या कुटुंबांनी सांगितले.

आ.आशुतोष काळेंनी सांगितले की, विकासकामे करतांना कधीच भेदभाव केला नाही आणि करणार पण नाही. नेहमीच सर्व सामान्य जनतेचा विचार करतो, प्रलोभन दाखविणे हा माझा स्वभाव नाही जे ठरवलं ते करतोच. येणारा काळ जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, जिल्हा बँक, ग्रामपंचायत अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा काळ आहे त्या दृष्टीने तयारीला लागावे.

#### प्रवेश करणाऱ्यांचा केला सत्कार

यावेळी कोल्हे गटाचे यशवंत कदम, सुभाष कदम, ज्ञानेश्वर कदम, दादासाहेब कदम, बापू कदम, ज्ञानेश्वर कदम, शंकर बोर्डे, भाऊसाहेब कोटकर, अनिल पवार, मधुकर खंडीझोड, शुभम खंडीझोड, रतन सोनवणे, सचिन भवर, संजय खंडीझोड, प्रतीक कदम, किरण कदम यांचे आ.आशुतोष काळे यांनी स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## नेवासा नगरपंचायत निवडणूक धोक्यात?

### मतदार यादीतील गंभीर चुका न्यायालयात नेणार का?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा नगर पंचायत निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या प्रारूप मतदार याद्यांमधील गंभीर चुकांमुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अनेक मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात गेली असून, काहींची नावे यादीतूनच वगळली गेली आहेत. या गोंधळामुळे नागरिक आणि इच्छुक उमेदवार संतप्त




झाले असून, निवडणुकीच्या पारदर्शकतेवर संशय निर्माण झाला आहे. त्यामुळे ही बाब न्यायालयापर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रभाग रचना आधीच विसंगत पद्धतीने झाल्याने मतदारांची ओळख गोंधळात पडली होती. आता मतदार यादीतील या त्रुटी उघड झाल्याने परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनली आहे. अनेक मतदारांच्या नावात, वडिलांच्या नावात किंवा विवाहित महिलांच्या बाबतीत पतीच्या नावात चुका आढळल्या आहेत. काही ठिकाणी आडनाव गायब आहे, ज्यामुळे मतदानाच्या दिवशी मतदाराची खरी ओळख पटवणे कठीण होऊ शकते. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार अशा चुका तातडीने दुरुस्त करणे प्रशासनाचे कर्तव्य आहे, मात्र प्रत्यक्षात नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

या गोंधळाबाबत नागरिक आणि संभाव्य उमेदवारांकडून नगरपंचायत मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्याकडे तक्रारी दाखल झाल्या आहेत.

> प्रारूप यादीतील त्रुटी आणि नागरिकांच्या तक्रारींची नोंद आम्ही घेतली आहे. नागरिकांनी आपल्या प्रभागात झालेल्या चुकीच्या बदलांबद्दल आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यात अर्ज करावा. प्रशासन प्रत्येक तक्रारीची चौकशी करून योग्य दुरुस्ती करेल.
>
> **–निखिल फराटे,**
> **मुख्याधिकारी, नेवासा**

## 'गौतम'च्या मुलींचे व्हॉलीबॉल स्पर्धेत यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर आयोजित जिल्हास्तरीय मुलींच्या शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा अहिल्यानगर येथे पार पडली. गौतम पब्लिक स्कूलच्या मुलींच्या १४ वर्षाखालील संघाने संपूर्ण स्पर्धेत आपले वर्चस्व राखून हि स्पर्धा जिंकली.

स्पर्धेत खेळतांना गौतमच्या मुलींनी उपांत्यपूर्व सामन्यात कर्जत संघाचा सरळ सेटमध्ये २५-१३ असा पराभव केला तर उपांत्य सामन्यात नेवासा तालुका संघाचा



सरळ सेटमध्ये २५-१२, २५-१६ असा पराभव करून फायनलमध्ये प्रवेश केला.

इंदापूर येथे होणाऱ्या शालेय विभागीय हॉलीबॉल स्पर्धेत गौतम पब्लिक स्कूलचा विजेता संघ नेतृत्व करणार असल्याची माहिती शाळेचे प्राचार्य नूर शेख यांनी दिली. गौतम पब्लिक स्कूल च्या मुलींच्या विजेत्या हॉलीबॉल संघाचे मा. आ. अशोकराव काळे, आ. आशुतोष काळे, चैतालीताई काळे, छबुराव आव्हाड व प्राचार्य शेख यांनी अभिनंदन केले.

## शिंदे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी, औटेवाडी, आजनुज येथे ३६ वर्षे सेवा दिली. त्यांच्या हातून बरेच असे विद्यार्थी चांगल्या पदावरती कार्य करत आहेत. त्यांचा सेवापूर्ती समारंभ तुळशीदास मंगल कार्यालय श्रीगोंदा येथे संपन्न झाला. त्यांचा मुलगा ॲड. सुशील कुमार शिंदे यांनी आईच्या सेवापूर्ती समारंभाच्या निमित्ताने जिल्हा परिषद शाळा मेहेत्रे वस्तीगणपती मळा येथे कॉम्प्युटर व प्रिंटर भेट देण्यात आला.

शिंदे यांनी प्रभाग क्रमांक २ मधील नागरिकांच्या समस्या जाणून




घेत स्वखर्चाने रस्त्यावरती मुरूम व विद्युत लाईटच्या खांबावरती लाईट बसवण्याचे काम स्वखर्चाने हाती घेतले आहे. या कार्यक्रमाला खा. निलेश लंके,राहुल जगताप, बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार, बाळासाहेब नाहटा, दत्तात्रय पानसरे, नगराध्यक्ष शुभांगी पोटे, माजी नगरसेवक दादासाहेब औटी, राजू गोरे यांनी मनोगते व्यक्त केले.

या कार्यक्रमाला शिक्षक नेते,शिक्षक वर्ग मान्यवरांसह मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साईकुमार शिंदे यांनी केले तर आभार सुशील कुमार शिंदे यांनी मानले.

## विखे कुटुंबियांकडून पं. प्रदीपजी मिश्रांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** पूजनीय पं. प्रदीपजी मिश्रा महाराजांच्या स्वागतासाठी दोन हजार युवकांनी दुचाकी वाहनांची रॅली काढून लोणीपर्यत स्वागत केले. जय श्रीराम आणि हर हर महादेव असा जयघोष करून सहकार पंढरीत सायंकाळी आगमन झाल्यानंतर विखे कुटुंबियांनी निवासस्थानी त्यांचे स्वागत केले. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, ध्रूव विखे पाटील यांच्यासह लोणी ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

मंत्री विखे पाटील यांच्या निवासस्थानी आगमन झाल्यानंतर शालिनीविखे पाटील, धनश्री विखे पाटील यांनी औक्षण आणि पाद्यपूजन करून त्यांचे स्वागत केले. प्रसिद्ध कथाकार पूजनीय पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या लोणी येथील वास्तव्यानिमित्त राहाता ते लोणीपर्यत अभूतपूर्व मोटारसायकल रॅली काढण्यात आली. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली तब्बल दोन ते अडीच हजार युवकांनी भगव्या पताका फडकवत 'हर हर महादेव'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला.

रॅलीचा प्रारंभ अस्तगाव येथून झाला असून, ती राहाता मार्गे लोणी येथील विखे पाटील निवासस्थानावर पोहोचली, जिथे पूजनीय पं. प्रदीपजी मिश्रा हे वास्तव्यास असणार आहेत. मार्गात सर्वत्र



नागरिक, महिला मंडळे व युवक संघटनांनी महाराजांचे स्वागत केले. या रॅलीसाठी अत्यंत काटेकोर नियोजन करण्यात आले होते. वाहतूक व्यवस्था, सुरक्षा, फुलसजावट, साऊंड सिस्टीम आणि स्वयंसेवकांची नेमणूक यासाठी वेगवेगळ्या समित्या कार्यरत होत्या. डॉ. विखे पाटील यांनी स्वतः नियोजनाचे मार्गदर्शन केले होते.

#### युवकांमध्ये केला उत्साह निर्माण

रॅलीतील सर्व सहभागी युवकांनी भगव्या झेंड्यांसह आणि 'शिवमहापुराण की जय', 'हर हर महादेव', 'जय श्रीराम'च्या जयघोषात शिस्तबद्ध मिरवणूक काढली. राहता-लोणी मार्ग भगव्या झेंड्यांनी सजविला गेला होता. अनेक ठिकाणी गावकऱ्यांनी जलपान आणि फुलवृष्टी करून स्वागत केले. या रॅलीत शेकडो महिला, वारकरी, झांज पथक, ढोल पथक आणि स्वयंसेवक सहभागी झाले होते. सर्वांनी मिळून ही भक्तिभावाची यात्रा उत्साहात पार पाडली.


हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709 * Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11